विज्ञान निर्भयता नीती

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

वर्ष दुसरे ▮ अंक दहावा ▮ ऑक्टोबर २०२३





## झाडाच्या मुळ्यांनी घेतला नागाचा अवतार

महा. अंनिसचे

# विवेक जागर प्रकाशन

महा. अंनिसच्या विवेक जागर प्रकाशनाची आणि अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीशी संबंधित पुस्तके ४० ते ५० टक्के सवलतीत उपलब्ध.

भरघोस सवलत

**कथा अंधश्रद्धांच्या, व्यथा माणसांच्या**
– डॉ. ठकसेन गोराणे । ₹ २४०

**चमत्कार एक भुलभुलैया**
–मच्छिन्द्रनाथ मुंडे । ₹ २३०

**फलज्योतिष : भ्रमातून वास्तवाकडे**
– डॉ. नितीन शिंदे । ₹ २००

**जोडीदाराची विवेकी निवड**
– संपा. आरती नाईक । ₹ १३०

**जातपंचायतींना मूठमाती**
– कृष्णा चांदगुडे । ₹ २२५

**ओळखा नवरत्नांचा विळखा**
– डॉ. नितीन शिंदे । ₹ ८०

**जादुई वास्तव**
– रिचर्ड डॉकिन्स । ₹ २५०

**सफर विश्वाची**
– डॉ. नितीन शिंदे । ₹ २००

**असाही विचार करायला काय हरकत आहे**
– डॉ. नितीन शिंदे । ₹ १२०

**यात असे आहे तरी काय?**
–डॉ. नितीन शिंदे । ₹ १२०

**अंतराळ समजून घेताना**
– डॉ. नितीन शिंदे । ₹ ११०

**दोस्ती ग्रहताऱ्यांशी**
– डॉ. नितीन शिंदे । ₹ ५०

**Friendship with stars and planets**
Dr. Pramod Ganganmale I Rs. 50

**मला बरं का वाटतं?**
– मच्छिन्द्रनाथ मुंडे । ₹ ११०

**भारतीय संविधानाचे अंतरंग**
– ॲड. एन. डी. सूर्यवंशी । ₹ ५०

**पृथ्वी मोलाचा माणूस**
– संपा. अरविंद पाखले, राजेंद्र कांकरिया । ₹ ३००

**सामाजिक बहिष्कार विरोधी कायदा** – ₹ ३०

**सर्पविज्ञान**
– उल्हास ठाकूर, प्रकाश शहा । ₹ २५

**सर्पविज्ञान (हिंदी)**
– गजेंद्र सुरकार । ₹ २०

**संघटना मार्गदर्शिका - शाखास्तर**
– विनायक सावळे । ₹ २०

**अलौकीक शक्ती और पाखंड**
– मच्छिन्द्रनाथ मुंडे । ₹ ३०

**वैज्ञानिक दृष्टिकोन**
– प्रमोदिनी व कुमार मंडपे । ₹ २०

**संविधान प्रास्ताविका कॅलेंडर** – ₹ २५

**शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा फोटो**
– ₹ १०

**टेबल कॅलेंडर** – ₹ १२०

**कोविड साथीपासून बचाव**
– डॉ. अनंत फडके । ₹ २०

**अंधश्रद्धेची दुनिया, चमत्काराची किमया हिंदी भाग १ व २**
– मच्छिन्द्रनाथ मुंडे, कुमार मंडपे
– पा. न. निपाणीकर । ₹ ११०

**वास्तुशास्त्र : एक चिंतन**
– डॉ. नितीन शिंदे । ₹ १३०

**पत्रिका जुळवताना**
– डॉ. नितीन शिंदे । ₹ ५०

**वयात येताना - स्वतःला जाणूया!**
– डॉ. माधुरी झाडे । ₹ ५०

**विवेक जागर प्रकाशन**

धुळे । अविनाश पाटील, अध्यक्ष, महा. अंनिस व विवेक जागर संस्था, भास्कर, ८६, संघमा चौक, गोळीबार टेकडी रस्ता, धुळे, ४२४००१

**9527206057**

नवल ठाकरे । सहकार्यवाह, विवेक जागर प्रकाशन

विवेकी विचार हेच खरे माणूसपणाचे लक्षण
महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

आम्ही वारस विवेकाचे

**वर्ष दुसरे । अंक दहावा**
**ऑक्टोंबर २०२३**

## अनुक्रमणिका


- **संपादकीय** ४
- **विचारमंथन**
  - सामाजिक एकजुटीचा हुंकार उमटावा/डॉ. बाबा आढाव ५
  - धर्म कधीही धोक्यात येत नसतो... / डॉ. राम पुनियानी ६
  - तत्त्वनिष्ठ राजकारणाचा अंत होतो आहे/हेमंत देसाई ९
  - राजकीय भूमिका घ्याव्या लागतील/अविनाश पाटील १२
  - धर्मांधतेच्या आव्हानाशी लढावे लागेल/रझिया पटेल १५
- **कार्याध्यक्ष संवाद**
  - अजूनही विस्तारायचे आहे /माधव बावगे १८
- **बुवाबाजी**
  - झाडाच्या मुळ्यांनी घेतला नागाचा अवतार/ रविंद्र पाटील २०
- **विज्ञान विश्व**
  - नरिंदरसिंह कपानी: फायबर ऑप्टिक्सचे जनक / डॉ. नितीन हांडे २४
- **जडणघडण**
  - कार्यकर्त्याने कुंपणावर बसू नये / भाऊसाहेब पठाडे २७
- **आंतरराष्ट्रीय समन्वय**
  - लोकशाहीच्या समर्थनासाठी मानवतावादी एकत्र / प्रा. डॉ. सुदेश घोडेराव ३०
- **महा.अंनिसची खबरबात** / अनिल शोभना वसंत ३२
- **गणितप्रेमी** / सुरज उर्मिला सुनील ३५
- **शब्दकोडे** / उत्तम जोगदंड ३६


'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' हे मासिक, विवेक जागर संस्थेकरिता, मुद्रक सुरेश रामचंद्र शिपूरकर व प्रकाशक संजय बापूराव बनसोडे यांनी भारती मुद्रणालय, ८३२ ई वार्ड, शाहूपुरी चौथी गल्ली, कोल्हापूर-४१६००१ येथे छापून, महात्मा फुले कॉलनी, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली-४१५४०९ येथून प्रकाशित केले. संपादक : नितीन शिवाजीराव शिंदे

'Andhashradha Nirmulan Patrika', monthly publication is owned by Vivek Jagar Sanstha. Printed by Suresh Ramchandra Shipurkar and Published by Sanjay Bapurao Bansode on behalf of Vivek Jagar Sanstha. Printed at Bharati Mudranalaya, 832, E Ward, Shahupuri 4th lane, Kolhapur-416001. Published from, Mahatma Phule Colony, Islampur, Tal. Walwa, Dist. Sangli- 415409. Editor :Nitin Shivajirao Shinde.

विज्ञान निर्भयता नीती

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

**संपादक मंडळ**

- **संपादक**
  डॉ. नितीन शिंदे
- **कार्यकारी संपादक**
  उत्तम जोगदंड
- **सहसंपादक**
  डॉ. श्यामसुंदर मिरजकर
- **व्यवस्थापकीय संपादक**
  अजय भालकर
- **सदस्य**
  डॉ. मांतेश हिरेमठ
  डॉ. बाळू दुगडूमवार
  प्रल्हाद मिस्त्री
  डॉ. सुशील मेश्राम
  डॉ. अरुण शिंदे
  तुकाराम शिंदे
  राजेंद्र फेगडे
- **सल्लागार मंडळ**
  किशोर बेडकिहाळ
  डॉ. प्रदीप पाटकर
  संध्या नरे-पवार
- **प्रकाशक**
  संजय बनसोडे
- **कार्यालयीन पत्ता**
  **अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका**
  'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर, इस्लामपूर ता.वाळवा जि.सांगली-४१५४०९
  मो. ९३५९०८०८२०
  email : manspatrika@gmail.com
  manspatrika@mans.org.in
- **अंक वितरण**
  अरबाज पटेल
- **मुखपृष्ठ**
  सचिन भोसले/कोल्हापूर
- **स्वागतमूल्य** : ₹ २०/-
- **पृष्ठ संख्या** : ४०

## मजबूरी का नाम...

ऑक्टोबर महिना आणि गांधी जयंती हे समीकरण प्रत्येक भारतीयांच्या मनावर कायमचे कोरले गेलेले आहे. ते मुख्यतः भारतीय स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी दिलेल्या योगदानाबद्दल. सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत कार्य करणारे नेते आणि कार्यकर्ते यांना गांधी भावतात ते त्यांनी शांततापूर्ण आंदोलन कसे करावे; याचा वस्तुपाठ घालून दिल्यामुळे. शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी स्थापन केलेली महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीसुद्धा याच मार्गाने, संविधानास डोळ्यासमोर ठेवून गेली चौतीस वर्षे अंधश्रद्धा निर्मूलनाचे आणि व्यापक समाजपरिवर्तनाचे कार्य करीत आली आहे. स्वातंत्र्यलढा असो किंवा सामाजिक परिवर्तनाचा लढा असो, काही समाजविघातक आणि धर्मांध शक्ती त्यास विरोध करतात. विचाराने विचारांना विरोध करणे, तसेच शांततापूर्ण आणि संवैधानिक मार्गाने विरोध करणे त्यांना जमत नसल्याने ते हिंसेचा मार्ग अवलंबतात आणि आपल्या विरोधकांच्या हत्या करतात. याच प्रवृत्तीने महात्मा गांधी यांचा बळी घेतला आणि अगदी अलीकडे डॉ. नरेंद्र दाभोलकर, कॉ. गोविंद पानसरे, डॉ. एम. एम. कलबुर्गी आणि गौरी लंकेश यांचा बळी घेतला. सध्या तर या शक्ती चौफेर उधळलेल्या आहेत.

माणूस मारला तरी विचार मरत नाहीत याचा प्रत्यय म. गांधी यांच्या हत्येनंतर आणि अलीकडे झालेल्या समाजसुधारकांच्या हत्येनंतरही येत आहे. हे वास्तव पचनी पडत नसल्याने या शक्ती त्यांच्या मृत्यूनंतरही त्यांच्याविषयी अपप्रचार करून, समाजात विखार पेरून त्यांची पुन्हा पुन्हा हत्या करण्याचे केविलवाणे प्रयत्न करताना दिसतात. परंतु एवढे करूनही हे नेते काही मरत नाहीत. उलट ते आपल्या विचारांच्या रूपाने जनमानसात कायमचे जिवंत आहेत आणि राहणार आहेत. याची प्रचिती गेल्या महिन्यात आपल्या देशाच्या राजधानीत आयोजित केलेल्या 'जी २०' शिखर परिषदेच्या वेळी आली. या परिषदेसाठी उपस्थित सर्व राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी गांधी समाधी, राजघाट येथे एकत्र येऊन अगदी शिस्तीत गांधीजींना अभिवादन केले. यात जगातील महासत्ता मानल्या गेलेल्या राष्ट्रांचा समावेश आहे. सनातनी विचारांचे लोक गांधीजींच्या विरोधात खालच्या थरावर येऊन, अत्यंत अश्लाघ्य भाषेत दुष्प्रचार करत असताना, त्यांच्या खुन्याचे उदात्तीकरण करत असताना, त्यांच्या फोटोवर गोळ्या झाडत असताना, त्यांच्या माता-पित्यांवर शिंतोडे उडवत असताना जगभरातले शक्तिशाली देशांचे प्रतिनिधी पंतप्रधानाच्या नेतृत्वाखाली गांधीजींच्या समाधीसमोर नतमस्तक होतात. यास काव्यागत न्याय म्हणावे की 'मजबुरी का नाम महात्मा गांधी' हा अपप्रचार खोडून टाकणारे प्रात्यक्षिक म्हणावे, असा प्रश्न पडतो. गांधीजी आपल्या शांततापूर्ण आंदोलने आणि उपोषणे या मार्गाने इंग्रजांना मागण्या मान्य करायला मजबूर करीत असत. म्हणून हा वाक्यप्रचार प्रचलित झाला होता. यामुळेच आज सारे जग आपल्या देशाला गांधीजींच्या नावाने ओळखते.


यावरून गांधी मरत नसतात हे सिद्ध होतेच, पण गांधीजी अपरिहार्य आहेत हे सुद्धा सिद्ध होते. त्यांच्या मार्गावर चालून महा. अंनिसने महाराष्ट्र सरकारला दोन कायदे मंजूर करायला मजबूर केले होते, हा अगदी ताजा इतिहास आहे. यामुळेच की काय धर्मांध, सनातनी प्रवृत्ती महा. अंनिसमागे हात धुवून लागल्या आहेत आणि अपप्रचाराची राळ उडवून समाजात अंनिसविषयी आणि डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्याविषयी गैरसमज पसरवीत आहेत. परंतु खऱ्याला मरण नसते, हे गांधीजी आपल्याला पदोपदी दाखवून देत आहेत. महात्मा गांधींना त्यांच्या जयंतीनिमित्त वंदन करूया. विवेकाचा आवाज बुलंद करूया!

**उत्तम जोगदंड**

अतिथी संपादक

महा. अंनिससाठी विवेक जागर संस्थेच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, प्रकाशक, महा. अंनिस आणि विवेक जागर संस्था सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर बाबींसाठी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाहेब इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली यांचे कार्यक्षेत्र असेल.

# सामाजिक एकजुटीचा हुंकार उमटावा



डॉ. बाबा आढाव

**महा.अंनिसच्या वतीने शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या दहाव्या स्मृतिदिनानिमित्त २० ऑगस्ट २०२३ रोजी पुणे येथे आयोजित विवेक निर्धार मेळाव्यात डॉ. बाबा आढाव यांनी केलेले भाषण.**


मित्रांनो,

डॉ. दाभोलकरांच्या खुनाला आज १० वर्षे पूर्ण झालीत. परंतु अजूनही तपास पूर्ण झालेला नाही. त्याला कारण आजचे सामाजिक, राजकीय वातावरण कलुषित झालेले आहे; सत्ताधाऱ्यांना त्याबाबत कोणतीही इच्छाशक्ती राहिलेली नाही. आपण चळवळ म्हणून, संघटना म्हणून सरकारकडे गाऱ्हाणे केले, पाठपुरावा केला. परंतु सरकार यात काही कृती करणार नाही, हे आपण सारखं बघत आहोत आणि तसे आता जवळजवळ स्पष्ट झालेले आहे. कारण सरकारच मुळी मारेकऱ्यांच्या वृत्तीचं आणि त्यांना प्रेरणा देणारं आहे. आजच बघा ना, महात्मा गांधींच्या वडिलांचं नावसुद्धा बदलण्यापर्यंत मनोहर भिड्यांची मजल गेलेली आहे आणि ज्या पद्धतीने महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री त्या भिडेंची भलावण करतात ही शरम वाटणारी बाब आहे, अतिशय दुःखद आहे. अशा लोकांकडून न्यायाची अपेक्षा करण्यात काही हशील नाही. मग आपण न्यायासाठी कसे लढणार आणि लोकांना त्या लढाईत कसे सामील करून घेणार?

मी स्वातंत्र्य चळवळीत होतो आणि स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सतत परिवर्तनाच्या चळवळीत आहे. सामान्य माणसापर्यंत हे स्वातंत्र्य पोहोचावे यासाठी आपण एवढी कामे करतो. पण आपल्या या चळवळीच्या काही व्यथा आहेत. हे स्वातंत्र्य लोकांपर्यंत पोहोचू नये म्हणून आपल्या चळवळींचे काही हितशत्रूसुद्धा निर्माण झाले आणि आपल्या कामाला रोखण्यात त्यांना काही प्रमाणात यश आलेलं आहे. या आव्हानाचा सामना आपण कसा करणार? गेल्या पिढ्यांचं जाऊद्या, मात्र या आव्हानांना तोंड देण्यासाठी आपण येणाऱ्या पिढ्यांना कसे सक्षम करणार याकडे मी अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे लक्ष वेधू इच्छितो. त्यासाठी आपल्याला सर्वसामान्यांच्या, अगदी खेडोपाडीच्या लोकांना समजेल अशा पद्धतीने त्यांच्या बोलीभाषेत मांडणी करावी लागेल. चळवळीची आव्हाने आणि त्यांना तोंड देण्याची सामान्य माणसाची तयारी आपल्या चळवळींना करून घ्यावी लागेल. याबाबत आपल्याला अल्पसंतुष्ट राहून चालणार नाही. मित्रहो, जेव्हा दाभोलकर गेले तेव्हा मी अमेरिकेत होतो. मात्र, इथे आल्यानंतर जेव्हा एका मोर्चात मी फुले, शाहू, आंबेडकर; आम्ही सारे दाभोलकर अशी घोषणा ऐकली तेव्हा मला बरे वाटले. ते यासाठी की, अंधश्रद्धा निर्मूलन समिती फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारधारेचा वारसा सांगत दाभोलकरांचे कार्य ही चळवळ पुढे नेत आहे.

आजचे सामाजिक, राजकीय वातावरण आणि संस्कृतीच हिंसक बनली आहे. संविधानाने जी एक मूल्यांची संस्कृती निर्माण केली तिला आणि कायद्याच्या राज्यालाच आव्हान निर्माण केले जात आहे. चळवळींच्या पुढील हे सांस्कृतिक आव्हान आहे. या हिंसक संस्कृतीत लोकशाहीवादी, समाजवादी चळवळी पिछाडीला गेलेल्या आहेत; म्हणून यापुढे परिवर्तनवाद्यांना संविधानिक मूल्यांवर आधारित सांस्कृतिक पातळीवर काम करावे लागेल. याविषयी चळवळीतील अगदी शेवटच्या कार्यकर्त्याचे देखील प्रबोधन झाले पाहिजे. एकीकडे आधुनिकता येत असताना प्राचीन कालबाह्य संस्कृती आणि प्रतिगामी विचारधारेचा पुरस्कार केला जातो आहे. अशा वेळी पुरोगामी चळवळींनी प्रयत्नपूर्वक एकजुटीने पुढे कसे जाता येईल हे पाहिले पाहिजे. जनतेच्या व्यापक एकजुटीने काय करता येईल या विषयावर एकत्रित हुंकार उमटला पाहिजे. पुरोगामित्वाचे

**(पृष्ठ क्रमांक २३ वर पहा)**



# धर्म कधीही धोक्यात येत नसतो...

**डॉ. राम पुनियानी**
७९८९५८५७०९

**महा.अंनिसच्या वतीने शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या दहाव्या स्मृतिदिनानिमित्त २० ऑगस्ट २०२३ रोजी पुणे येथे आयोजित विवेक निर्धार मेळाव्यात डॉ. राम पुनियानी यांनी केलेल्या हिंदी भाषणाचा मराठी अनुवाद.**

प्रिय मित्रांनो, आपण मला इथे आमंत्रित केल्याबद्दल आपले आभार. एकीकडे, आपण आज दुःखात आहोत, कारण डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची हत्या होऊन दहा वर्षे झाली तरी अजून हत्येमागील कोणी पकडले गेले नाहीत, की त्यांना पकडायची इच्छाच नाही? आणि दुसरीकडे सर्वात आनंदाची बाब ही आहे की, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे काम वाढत आहे ते पाहता डॉ. दाभोलकर जिवंतच आहेत आणि राहणार आहेत.

विवेकीविचार हवेमध्ये किंवा पुस्तकात असणारा विषय नसून सामाजिक बदलाचा आधार आहे. आपल्याला समतामूलक समाज हवा असेल, स्त्री-पुरुष समानता हवी असेल, सर्व धर्मांत समानता हवी असेल, तर याचा आधार विवेकीविचार आहे. पण त्याविरुद्ध, श्रद्धेच्या नावाखाली काही अंधश्रद्धांना समाजावर लादणे चालू आहे. श्रद्धा ही अंधश्रद्धेत अगदी सहजपणे परिवर्तित होते, याची सुरुवात फार पूर्वी झालेली आहे. इथल्या वर्णव्यवस्था, जातीव्यवस्थेचा जो अत्याचार आहे तो खूप पुरातन आहे, खूप खोलवरचा आहे. वेदात पुरुषसूक्त सांगते की, ब्रह्माच्या मुखातून-अवयवांतून वर्णांची, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, यांची निर्मिती झाले आहे. वेद तर देवांनी निर्माण केलेले, तर त्याला बदलणारे आपण कोण लागून गेलो; असे म्हणतात! तर, याविरुद्ध प्रथमच व्यक्त झाला, चार्वाक. तो म्हणाला, ही व्यवस्था ब्रह्माची निर्मिती आहे हे मी मानत नाही. हे मानव-समाजातूनच आलेले आहे म्हणून ते बदललेसुद्धा जाऊ शकते. यावर पुरोहित धर्माची प्रतिक्रिया काय उमटली? तर जो कोणी चार्वाकाचे म्हणणे मान्य करेल तो अत्यंत अनैतिक मार्गाला लागेल आणि पुढील जन्मी तो कोल्हा म्हणून जन्म घेईल. अशा प्रकारे शापाची भीती दाखवली गेली.

चार्वाकानंतर जगात भारताला ज्या महापुरुषाच्या नावाने ओळखले जाते ते गौतम बुद्ध आले. गौतम बुद्धांनी हेच सांगितले की, ही कसली वर्णव्यवस्था, ही कसली जातीव्यवस्था, ही कसली उच्च-नीचता? आपण सारे समान आहोत. त्यांच्या विचारांचा खूप प्रसार झाला. याबाबत सम्राट अशोक यांची आठवण येते. राजेलोक धर्माचा प्रचार करत नाहीत. याला अपवाद आहेत सम्राट अशोक. सम्राट अशोक यांनी आपल्या बौद्ध धर्माचा प्रसार जगभर, विशेषतः आग्नेय आशियात केला. पण तो प्रसार तलवारीच्या जोरावर नाही, तर प्रेमाच्या आधारावर केला? सम्राट अशोक यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केलेला होता तरीही ते लोकांचे धार्मिक स्वातंत्र्य मान्य करीत होते. त्यावेळेस प्रचलित असलेला ब्राह्मण धर्म त्यांनी संपवला नाही, जैन धर्म होता, आजीवक होते, बौद्ध धर्म होता. त्यांनी शिलालेखातून सांगून ठेवले आहे की, सर्वांना समानतेने जगण्याचा अधिकार आहे आणि मी राजा अशोक प्रजेच्या पित्याच्या भूमिकेत सर्वांच्या कल्याणाचा विचार करणार आहे.

आता मी तिसऱ्या महापुरुषाकडे वळतो. संत कबीर. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पहिले गुरू आहेत गौतम बुद्ध, दुसरे गुरू संत कबीर. संत कबीरांच्या एकेका रचनेत पूर्ण मानवता आणि समता दडलेली आहे. सानेगुरुजींची प्रार्थना आपण म्हणतो, ‘खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे...’ त्याचे मूळ आहे हा कबीरचा दोहा :

‘पोथी पढ पढ जग मुआ,
पंडित भया न कोय ।
ढाई आखर प्रेम के

पढे सो पंडित होय।।'

संत कबीरांच्या म्हणण्याची आठवण मला वेळोवेळी येत राहिली, जेव्हा १९९२ नंतर भारत एका रिव्हर्स गिअरमध्ये जाऊ लागला, तेव्हा ते म्हणत होते, इथे मशीद आहे. तिच्या खाली मंदिर आहे, तर आम्हाला ते मंदिर पाहिजे. मंदिर वही बनायेंगे.

या आधी, वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले दुसरे एक महान व्यक्तिमत्त्व होते पंडित नेहरू. त्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनाला समोर आणले होते. संविधानाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये त्यास स्थान दिले. आंबेडकर आणि नेहरू यांच्यात काही मतभेद जरूर असतील, असणे साहजिकच आहे. गांधी आणि आंबेडकर यांच्यात मतभेद होते. परंतु त्यांच्यात समानता होती. एकीकडे नेहरू म्हणायचे वैज्ञानिक दृष्टिकोनास संविधानात स्थान द्या. बाबासाहेब आपल्या परिष्कृत भाषेत तो संविधानात ठेवीत होते. नेहरूंचे भाक्रा-नांगल धरणाच्या उद्‌घाटनाच्या वेळचे वक्तव्य थोडा बदल करून मी सांगतो. ते म्हणाले होते, 'धरणे, शैक्षणिक संस्था, सार्वजनिक क्षेत्रातले उपक्रम, आरोग्य केंद्रे, ही आधुनिक भारताची मंदिरे आहेत.' आणि या वैज्ञानिक दृष्टिकोनास उलटे फिरवण्यासाठी १९८० साली ते रथयात्री आले आणि म्हणू लागले, 'आमची आधुनिक पूजास्थळे तर मशिदीच्या खाली आहेत.' मशिदी तोडा, मंदिरे बनवा हा नवीन मार्ग सुरू झाला. ती माझ्या मते, प्रतिक्रांती आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'भारतीय इतिहासात बुद्ध धर्माचे म्हणजे वैज्ञानिक दृष्टिकोनाचे, समतेचे येणे, ही क्रांती होती आणि या क्रांतीच्या विरोधात जे काही आले पुष्यमित्र शुंग, शशांक आणि नंतर शंकराचार्य, त्यांनी वर्णव्यवस्था आणि श्रद्धेवर आधारित ज्ञानाची पुनर्स्थापना केली, ती प्रतिक्रांती होती.' डॉ. नरेंद्र दाभोलकर यांना मी बघतो तेव्हा त्यांना क्रांतीचे वाहक या स्वरूपात बघतो, जी क्रांती स्वातंत्र्यानंतर आली. वैज्ञानिक दृष्टिकोनाला एक आंदोलनाच्या रूपाने जनसामान्यांपर्यंत घेऊन जाणे हे डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचे महान योगदान होते.

एकीकडे नेहरूजी यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन आणला. मला त्यांनी स्थापन केलेल्या संस्थेत काम करण्याचे भाग्य लाभले, प्रेरणा मिळाली. त्या विचारांच्याविरुद्धच्या प्रतिक्रांतीने डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची हत्या केली. ती काही एकटी-दुकटी बाब नाहीये. ती एका संपूर्ण प्रक्रियेचा एक भाग आहे. हे 'संपूर्ण' काय आहे? संपूर्ण प्रक्रिया काय आहे? ती मोठी प्रक्रिया अशी आहे की समजाच्या मूळ मुद्द्यांना त्यांच्यापासून दूर करून अशा बाबींकडे त्यांचे लक्ष वळवायचे की, जी केवळ समाजातील काही सवर्ण लोकांना चांगल्या स्थितीत ठेवील आणि सामान्य लोकांची परिस्थिती बिघडत जाईल. आता लक्षात येते की, अर्थव्यवस्था बुडायला आलेली आहे. आपण बघत आहोत की, काही श्रीमंत लोक अजून श्रीमंत होत आहेत. ऑक्सफॅमच्या रिपोर्टनुसार समाजातील वरचे ३ टक्के लोक ६० टक्के मालमत्तेवर नियंत्रण ठेवतात आणि ९० टक्के लोकांच्या हाती केवळ ३ ते ४ टक्के मालमत्ता आहे. श्रीमंत आणि गरीब लोकांमधील दरी वाढत चालली आहे. संविधान काय सांगते? (State may take efforts to reduce the disparity of the people. राज्यसंस्थेने म्हणजे शासनाने ही दरी कमी करण्यासाठी प्रयत्नशील असावे.)

स्वातंत्र्याच्या मूल्यांकडे पाहात मी समोर तीन प्रतीकं सादर करतो. सर्वप्रथम शहीद-ए-आजम भगत सिंग आणि त्यांची संघटना 'नौजवान भारत सभा.' दुसरे माझे प्रतीक आहेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर. बऱ्याच संघटना त्यांनी निर्माण केल्या. शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन, बहुजन हितकारिणी सभा आणि शेवटी खूप सारे तुकडे झालेली एक संघटना. तिसरे सांगण्याआधी त्यातल्या चार लोकांची नावे सांगतो. मौलाना अबूल कलाम आझाद, ॲनी बेझंट, सरदार बलदेव सिंग आणि मोहनदास करमचंद गांधी. पार्टीचे नाव? भारतीय राष्ट्रीय काँग्रेस. तिन्हींच्या नावात धर्म नाहीये, राष्ट्र आहे. ज्यात हिंदू, मुस्लीम, शीख, ख्रिश्चन, पारसी, जैन, बौद्ध, स्त्री-पुरुष, सर्व भाषिक आणि सर्व क्षेत्रातील लोक यात येतात. हे लोक वर येत होते औद्योगिकरण आणि आधुनिक शिक्षणामुळे. हे शिक्षण आज आपण दलितांपर्यंत, महिलांपर्यंत घेऊन जाऊ शकलो आहोत आणि त्यासोबत वैज्ञानिक दृष्टिकोनाची सुरुवात झाली आहे, तर इकडच्या ज्या संघटना आहेत भगत सिंग यांच्या असोत, आंबेडकर यांच्या असोत किंवा गांधींच्या असोत, त्यात कुठे ना कुठे वैज्ञानिक दृष्टिकोन लपलेला आहे. याचा विरोध करणारे आहेत, शेठजी-भटजी. मुसलमान नवाब, हिंदू राजा, मुसलमान जहागीरदार, हिंदू जमीनदार, या लोकांना वाट

लागले, हे काय चाललं आहे? सवित्रीबाई फुले आणि त्यांच्या शाळेतल्या पहिल्या शिक्षिका फातिमा शेख यांच्या त्यागामुळे आज इथे असंख्य महिला आणि मुली दिसत आहेत. याविरुद्ध प्रवाह आला, जुने राजा, नवाब, जहागीरदार, जमीनदार यांचा. ते म्हणाले, 'हे तर धोकादायक आहे. स्त्रियांमध्ये शिक्षण जाते आहे, दलितांमध्ये शिक्षण जाणे आहे, मजूरवर्ग वर येत आहे, भगत सिंग यांची विचारधारा विकसित होते आहे.' तर याविरुद्ध मुसलमान नवाब म्हणाले, 'इस्लाम खतरे में है.' हिंदू राजे म्हणत, 'हिंदू धर्म खतरे में है.' मी एक निवेदन करतो, धर्म कधी धोक्यात येत नाही, मानवतेची मूल्ये कधी धोक्यात येत नाहीत. धोक्यात असते काही लोकांची सत्ता. जे म्हणतात, 'आमचा धर्म धोक्यात आहे.' तेव्हा कुणाची सत्ता धोक्यात असेल याचा, आपण विचार करायला हवा.

संघर्ष दोन प्रकारच्या मूल्यांचा आहे. एक मूल्य जे स्वातंत्र्याच्या आंदोलनातून आले समता, बंधुता, न्याय, ज्यांच्या मागे आहे, वैज्ञानिक दृष्टिकोन, तार्किक दृष्टिकोन. तर दुसरीकडे जे मूल्य आहे त्याचे प्रतिनिधी कोण होते; के. सुदर्शन, तत्कालीन सरसंघचालक. तत्पूर्वी, एक लक्षात घ्या, बाबासाहेब एकूण एक ब्राह्मणांचा तिरस्कार करीत नव्हते. त्यांना तिरस्कार वाटायचा तो ब्राह्मणवादाविरुद्ध, ब्राह्मणांविरुद्ध नाही. सहस्रबुद्धे यांच्या माध्यमातून त्यांनी मनुस्मृती जाळली. तेच बाबासाहेब भारतीय संविधानाच्या ड्राफ्टिंग कमिटीचे अध्यक्ष बनले. त्या संविधानाबाबत के. सुदर्शन म्हणाले, 'भारतीय संविधान विदेशी मूल्यांवर बेतलेले आहे.' काही लोक म्हणतात, 'हे संविधान तर जुने झाले आहे आणि हे आपल्या सांस्कृतिक मूल्यांशी मेळ खात नाही.' कोणत्या सांस्कृतिक मूल्यांशी? मनुवादी मूल्यांशी, ब्राह्मणवादी मूल्यांशी? १५ ऑगस्ट, २०२३ रोजी 'मिंट' मधील लेखात पंतप्रधानांच्या सल्लागारांनी लिहिले, संविधान बदलून टाका. आणि का? कारण यातील समतेची, बरोबरीची, स्वातंत्र्याची, सामाजिक कल्याणाची, समाजवादाची मूल्ये आहेत; जी यांना चालत नाहीत. हे आज खूप मोठ्या प्रमाणात समाजामध्ये चालू आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता ही संविधानातील मूल्ये मानवतेची मूल्ये आहेत, ते एखाद्या देशाची कशी असू शकतात? अशीच अजून एक विदेशी संघटना आहे जी इस्लामच्या नावाने इस्लामी देशात मागासलेपणा आणू इच्छित आहे. तिचे नाव आहे मुस्लीम ब्रदरहूड. तीसुद्धा अशा मूल्यांना युरोपियन मूल्ये आहेत असे म्हणते.

एकीकडे स्वातंत्र्याच्या आंदोलनानंतर या मूल्यांचा पुरस्कार केला, ती पुढे आणली गेली. तर दुसरीकडे जुन्या मूल्यांचे, मनुस्मृतीचे, उच्च-नीचतेचे गुणगान करून वैज्ञानिक दृष्टिकोनाची हत्या केली जात आहे. ते गप्प बसले नाहीत. ते शाखांच्या माध्यमातून महिन्यातले तीस दिवस, वर्षातले बारा महिने सतत सिद्धांतरोपण करीत आहेत की, हे अनादिकाळापासून हिंदू राष्ट्र आहे. ही राष्ट्राची कल्पना किती जुनी आहे? तीनशे वर्षे, चारशे वर्षे? पूर्वी मनुष्य शिकारी अवस्थेत होता. पशुपालक अवस्थेत होता. मग पशुपालक अवस्थेत राष्ट्र होते काय? ज्याला जिथे जावेसे वाटत होते तिथे जात होता. आर्यांना वाटले, इकडे गंगेच्या किनाऱ्यावर छान हिरवे गवत आहे, आले ते इकडे. त्यानंतर आली राजेशाही.

राजेशाहीत काय होत होते? राजेशाहीत राजा आपल्या राज्याचा विस्तार करायचा आणि गरीब शेतकऱ्यांकडून शेतसारा वसूल करायचा. एक अभ्यास करा. मनात दोन रेषा आखायच्या आहेत. एक रेषा शेतकऱ्याच्या पोटाची आणि एक रेषा राजाच्या पोटाची. शेतकऱ्याच्या पोटाची रेषा तुम्ही बाहेर जाणारी दाखवणार की आत? हीच राजेशाही आहे. ही राजेशाही नको आहे. सम्राट अशोक यांनी काही चांगले सांगितले त्याचा स्वीकार करा. शिवाजी महाराजांनी जे काही चांगले सांगितले त्याचा स्वीकार करा. परंतु, राजेशाही नकोच.

आज एका मोठ्या आव्हानाचा सामना करायचा आहे. दाभोलकरांचे सिद्धान्त आपण वेगळे करून नाही बघू शकत. दाभोलकरांचे सिद्धान्त पूर्ण विचारसरणीची एक पद्धत असली पाहिजे आणि ती पद्धत आहे लोकतंत्र, स्वातंत्र्य, समतेच्या मूल्यांना मजबूत करणे. त्यात अंधश्रद्धा निर्मूलन हे केंद्रस्थानी आहे, त्याचा कणा आहे. धर्माच्या नावावरचे राजकारण देशाला मागे लोटते. पाकिस्तानात धर्माच्या नावाने राजकारण सुरुवातीपासूनच आले. काय झालंय तिकडे? धर्माविषयी मला प्रेम आहे. कारण धर्म, 'खरा तो एकाची धर्म... जगाला प्रेम अर्पावे' आणि जे तिरस्कार निर्माण करते ते राजकारण आहे.

**(पृष्ठ क्रमांक २६ वर पहा)**

# तत्त्वनिष्ठ राजकारणाचा अंत होतो आहे



**हेमंत देसाई**
९८२०४७९६८८

**महा.अंनिसच्या वतीने शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या दहाव्या स्मृतिदिनानिमित्त २० ऑगस्ट २०२३ रोजी पुणे येथे आयोजित विवेक निर्धार मेळाव्यात हेमंत देसाई यांनी केलेले भाषण.**

डॉ. दाभोलकरांच्या स्मृतिदिनानिमित्त काही तासांपूर्वी निर्भय मॉर्निंग वॉकलादेखील मी होतो. स्मृतिदिनानिमित्तच्या अभिवादन आणि निर्धाराच्या या कार्यक्रमात विशेषतः तरुण आणि तरुणींचा मोठ्या संख्येने जो सहभाग आहे; तो अतिशय आश्वासक आहे. रझिया ताईंनी आता डॉ. दाभोलकरांच्या कार्याचा आढावा घेतला; त्यांचं कार्य किती बहुमोल होतं, व्यापक होतं, ती मांडणी विशेषतः तरुण पिढीला अत्यंत प्रेरणादायी आणि दिशादर्शक आहे. मुंबईतल्या अशाच कार्यक्रमाला परवानगी दिली गेली नाही असं मला कळलं. त्याबद्दल शासनाचा धिक्कार करावा तेवढा थोडाच आहे. हे सर्वसामान्यांचे सरकार आहे असं म्हणत या सरकारची अशी 'असामान्य' कामगिरी चालू आहे.

खूप वर्षांनंतर दाभोलकरांची विचारवंत व समाजसुधारक म्हणून हत्या झाली, ज्याच्यामुळे समाजाला धक्का बसला. नंतर ज्या तीन-चार विचारवंतांच्या हत्या झाल्या; त्यानंतर लोकांना धक्का बसणंही थांबलेलं आहे आणि हेच अधिक धक्कादायक आहे. विचारवंतांना, साहित्यिकांना, कलावंतांना कोण विचारतं? असा उद्धट प्रश्न काही विचारतात. पण विचारवंतांना जर काही महत्त्व नसतं तर दाभोलकर आणि त्यानंतरच्या विचारवंतांच्या हत्या झाल्या नसत्या. ज्या साखळी पद्धतीने या हत्या झाल्या त्या पाहता या हत्यांबाबत 'होत असतात अशा हत्या' अशी असंवेदनशील समाजमान्यता (legitimacy) रुजवण्याचा हा प्रकार होताना दिसतो आहे. आजच्या राजकीय आणि सामाजिक परिस्थितीत डॉ. दाभोलकरांसारखे लढाऊ सामाजिक नेतृत्व हवे होते. पूर्वीच्या काळात अशाच सामाजिक नेतृत्वातून राजकीय नेतृत्व पुढे येत असे. आजकाल राजकारणात करिअर किंवा व्यवसाय म्हणून लोक येतात. आज समाजकारणातील नेतृत्वच दिसत नाही आणि सामाजिक सुधारणा हा भागच लयाला गेला आहे.

मला येथे नमूद केले पाहिजे की, दाभोलकर हयात असताना ते सामाजिक मुद्द्यांची आर्थिक आणि राजकीय मुद्द्यांशी संलग्न अशी मांडणी करायचे. कारण याचा थेट आपल्या जीवनाशी संबंध आहे. त्याच अनुषंगाने विचार केला तर असे दिसते, धारावीचा प्रकल्प सर्व अटी बदलून अदानींच्या हवाली करणे, रामदेव बाबाला १३ कोटींची कर सवलत देणे अशाही काही 'असामान्य' कामगिरी या सरकारच्या चालू आहेत. केंद्र सरकारने आपल्या ई-कॉमर्सच्या क्षेत्रामध्ये असे काही धोरणात्मक बदल केले की, ज्यामुळे केवळ रिलायन्स या कंपनीला फायदा मिळेल आणि बाकीच्या कंपन्या आपोआप डावलल्या जातील. मोठमोठ्या महत्त्वाच्या कंपन्यांचे जे समूह निवडणूक रोख्यांच्या माध्यमातून ज्या देणग्या देत आहेत त्यातील ७० ते ८० टक्के देणग्या फक्त सत्ताधारी पक्षालाच मिळत असतील तर हा भ्रष्टाचार आहे, महाभ्रष्टाचार आहे. कारण व्यक्तिनिष्ठ भ्रष्टाचारापेक्षा असे काही धोरणात्मक बदल केले जात आहेत की, त्याचे लाभार्थी कोण आहेत ते थेट कोणालाही दिसणार नाहीत. अशा लबाडीच्या धोरणांनी (Tricking policies) बेमालूमपणे घाऊक (massive), सर्वव्यापी भ्रष्टाचार चालू आहे. थेट जनतेच्या नजरेला पडत नसल्याने कोणी आवाज उठवत नाही. इतर पक्षातील लोकप्रतिनिधींवर पक्षांतरासाठी हजारो कोटी खर्च केले जातात, तो पैसा येतो कुठून? हा प्रश्न सर्वसामान्य माणसाला पडला पाहिजे.

देवेंद्र फडणवीस यांनी २०१४ मध्ये मुख्यमंत्री पदाची शपथ घेताना साधू, बुवा, बैरागी यांचा जमाव मंचावर

जमवला नि त्यांचे आशीर्वाद घेतले. मी म्हणतो, तुम्ही मग संविधान मानता की मनीवाद मानता की मनुवाद मानता? गुजरातच्या २००२ च्या दंग्यांमध्ये अशाच तर साधू, बुवा, बैराग्यांचे 'आशीर्वाद' (हात) होते. धर्म आणि राजकारण यांची अशी घातक युती झालेली आहे. गेल्या वर्षी पुन्हा हे महाराष्ट्रात सत्तेत आल्यानंतर यांची बी.इ. एस.टी.च्या बसेसवर अशी जाहिरात होती की, 'हिंदू सणांवरती संक्रांत आणणारं सरकार गेलं.' एखाद्या सरकारचा असा अधिकृत प्रचार कसा असू शकतो? आयडियालॉजीचं, तत्त्वांचं राजकारण संपलं का? याबद्दल मी लिहिलेसुद्धा होते; परंतु कोणाला यावर आक्षेपही घ्यावासा वाटला नाही. सत्तेतून गेलेल्या सरकारने अशी कोणती संक्रांत, बंदी आणली होती का? कोरोना काळात तर सर्वच कार्यक्रम आणि सण, उत्सव साजरे झाले नव्हते. कुठल्याही धर्माला कोणाचा विरोध असण्याचं काहीच कारण नाही. परंतु सरकारने एखाद्या धर्माचे सण, उत्सव साजरे करत धार्मिक उन्माद आणि विद्वेष निर्माण करण्यासाठी जनता तुम्हाला निवडून देत असते काय? धर्मवादाला दिवसेंदिवस मिळणारे वाढते राजकीय पाठबळ हे संविधानिक मूल्यांशी प्रतारणा करणारे आणि आक्षेपार्ह आहे. सार्वजनिक सण, उत्सवात एखाद्या राजकीय पक्षातर्फे जो वारेमाप खर्च केला जातो तो येतो कुठून? यावर लोक कधी विचार करतील?

समाजकारणाचा भाग म्हणजे स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, वैज्ञानिक दृष्टिकोन, सत्य, अहिंसा अशी काही संविधानिक मूल्ये समाजात रुजविणे. स्वातंत्र्योत्तर या मूल्यांची सत्ताधाऱ्यांनी काही काळ तरी बूज राखली. मात्र भारतात आज तर पंतप्रधानांपासून सर्वांचाच खोट्याचा प्रचार चालू असतो; ही मूल्येच पायदळी तुडवली जाताहेत. पंडित जवाहरलाल नेहरू आणि फिरोज गांधी यांच्याविषयी अत्यंत असभ्यपणाने असत्य पसरवले जाते आहे. परंतु चीन प्रश्नाच्यावेळी नेहरूंनी विरोधकांनादेखील विश्वासात घेतले होते. वाजपेयींपासून सर्व विरोधकांनी त्यावेळी संसदेमध्ये चर्चा करण्यासाठी तयारी दर्शवली. मात्र आज मणिपूरमधील हिंसाचारासंबंधी चर्चा अपरिहार्य आणि आवश्यक असूनही त्याचा साधा उल्लेखही न करता ती टाळण्याचेच सरकारकडून प्रयत्न होतात. घडलेल्या हिंसाचारानंतर सत्तर दिवसांनी व्हायरल झालेल्या व्हिडीओवर युरोपीय संसदेने मीडियामध्ये प्रश्न विचारले तेव्हा हे 'विश्वगुरू' परदेशामध्येच मानसन्मान घेत तिकडेच हिंडत होते. परंतु युरोपियन संसदेचे जे काही म्हणणे, त्यांनी मागणी केली ती यांनी दुर्लक्षित केली. आजकाल सत्य आणि अहिंसा ही दोन्ही मूल्ये कचऱ्यात किंवा अडगळीत टाकूया, अशा प्रकारच्या गोष्टी केल्या जातात म्हणून अशावेळी सत्य आणि अहिंसा ही मूल्ये रुजवण्यासाठी १०० दाभोलकर आज आम्हाला पाहिजे आहेत. जिथे जिथे असत्य माझ्यासमोर येते तिथे मी माझ्यापरीने सत्य मांडत असतो आणि माझे अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य बजावतो.

हरिद्वारमध्ये धर्मसंसद झाली. धर्मसंसदेमध्ये उघड पद्धतीने धमक्या, प्रक्षोभक इशारे दिले गेले. प्रक्षोभक व्हिडिओ, कार्यक्रम दाखवण्यासाठी कुप्रसिद्ध अशा एका टी.व्ही. चॅनलचा संचालकसुद्धा त्या धर्मसंसदेत सहभागी होता. त्यानंतर दिल्लीमध्ये उघडपणे एकतर्फी पद्धतीने मुस्लिमांच्याविरोधी 'गोली मारो' अशा घोषणा देत दंगली झाल्या. भाजपच्या नेत्यांनी उघडपणे प्रक्षोभक वक्तव्ये केली. त्यांच्या विरोधात काहीही कारवाई करण्यात आली नाही (नूह आणि गुरुग्राममध्ये हेच झालेलं अलीकडे आपण बघितलं). त्याची प्रतिक्रिया दिल्लीमध्ये उमटली तेव्हा सुप्रीम कोर्टाला आदेश द्यावा लागला की, 'तुम्ही मोर्चा काढाल, त्यात प्रक्षोभक घोषणा द्यायच्या नाहीत आणि त्याचं सगळं व्हिडिओ चित्रण केलं पाहिजे. कुठल्याही बाबतीत कोणी तक्रार करण्याच्या अगोदरच राज्य सरकारने स्वतःहून कारवाई केली पाहिजे.'

या धर्मांधतेच्या आणि विद्वेषाच्या वातावरणात आपल्याकडे चित्रपट आणि कलाक्षेत्रातून मिळालेला धर्मनिरपेक्षतेचा, धार्मिक सलोख्याचा, सामाजिक सद्भावाचा, राष्ट्रीय एकात्मतेचासुद्धा एक वारसा आहे. या गोष्टी अनेक हिंदी चित्रपटांतून आलेल्या आहेत, पूर्वीच्या साहित्यातून, नाटकातून आलेल्या आहेत. या क्षेत्रातीलच टी.व्ही. मालिकांचा उल्लेखही करावा लागेल. नेहरूंच्या जगप्रसिद्ध 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या ग्रंथावर आधारित 'भारत एक खोज', श्याम बेनेगल यांची 'यात्रा', तसेच गोविंद निहलानी यांची 'तमस' अशा मालिकांचा उल्लेख करावा लागेल. अशा आणखीही काही टी.व्ही. मालिकांमध्ये धार्मिक सलोख्याबद्दल फारच

चांगल्या प्रकारे चित्रण करण्यात आले आहे. या गोष्टी आज आपण पुन:पुन्हा अधोरेखित केल्या पाहिजेत. नाटक, चित्रपट, साहित्य, कला, गाणी, पोवाडे, भारुडे अशा वेगवेगळ्या माध्यमांचा लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी नावीन्यपूर्ण पद्धतीने प्रभावी वापर केला पाहिजे. हिंदी चित्रपटातले 'तू हिंदू बनेगा, न मुसलमान बनेगा, इन्सान की औलाद है, इन्सान बनेगा' अशी जी अनेक गाणी आहेत त्यांचा आशय पुन्हा लोकांपर्यंत पोहोचवावा लागेल. अनेक गाण्यांमध्ये नौशादचे संगीत, मोहम्मद रफींचा आवाज, नटही मुसलमान आणि भक्तीरचना शकील बदायुनी यांच्या किंवा हिंदूसंतांच्या आहेत. अशा अनेक कलाकृतींच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मतेचा, धार्मिक सलोख्याचा, भारतीयांतील बंधुभावाचा जागर स्वातंत्र्योत्तर काही काळ जो चालला; तो पुन्हा आपल्याला करावा लागेल.

अशा अनेक चांगल्या गोष्टींचा इतिहास आणि वारसा आपल्याकडे आहे; तो पुन्हा मांडावा लागेल. माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी त्यांच्या पराभवाचे एक प्रमुख कारण सांगितलं की, 'आम्ही अनेक चांगल्या गोष्टी करूनही त्या आम्हाला जनतेपुढे मांडता आल्या नाहीत'. राजकीय प्रपोगंडा म्हणून इतिहासाच्या विकृतीकरणाच्या सध्याच्या काळात गांधी, नेहरू, सरदार पटेल, मौलाना आझाद तर अलीकडील ग. प्र. प्रधान मास्तर, एस. एम.जोशी, मृणालताई, अशा अनेक समाजसेवी तथा राजकारण्यांचे कार्य लोकांसमोर ठळकपणे आणावे लागेल. त्याचप्रमाणे प्रतिगाम्यांनी 'गोब्राह्मणप्रतिपालक' बिरुदावली चिकटवलेल्या शिवाजीच्या ठिकाणी कॉ. पानसरे यांनी मांडलेला 'रयतेचा राजा शिवाजी' सांगावा लागेल.

शब्दांकन –प्रल्हाद मिस्त्री

•



# राजकीय भूमिका घ्याव्या लागतील



**अविनाश पाटील**
९३७०१७३६५१

डॉ नरेंद्र दाभोलकरांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने आपण हा राज्यस्तरीय अभिवादन आणि निर्धार मेळावा घेत आहोत. आतापर्यंत मंचावर उपस्थित होते ते ज्येष्ठ मार्गदर्शक डॉ. बाबा आढाव, डॉ. राम पुनियानी, आता आपल्यात उपस्थित असलेल्या रझियाताई, ज्येष्ठ पत्रकार हेमंत देसाई, आपले कार्याध्यक्ष माधव बावगे, सर्वांना नमस्कार (यानंतर अविनाश भाईंनी मंचावर उपस्थित आणि मंचासमोरील अनेक मान्यवरांची नावे घेत त्यांचा चळवळीशी असलेल्या बंधांचा, संबंधांचा आणि योगदानाचाही उल्लेख करीत त्यांनाही कृतज्ञतेचा नमस्कार केला. जळगावचे स्मृतिशेष प्रा. शेखर सोनाळकर, बेळगावचे अ‍ॅड. राम आपटे व त्यांचे सहकारी अशोक देशपांडे यांचेही स्मरण करीत त्यांच्या योगदानाच्या उल्लेखासह त्यांना अभिवादन केले).

**महा.अंनिसच्या वतीने शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या दहाव्या स्मृतिदिनानिमित्त २० ऑगस्ट २०२३ रोजी पुणे येथे आयोजित विवेक निर्धार मेळाव्यात भाई अविनाश पाटील यांनी केलेले भाषण.**

संघटना स्थापन होण्याच्याही आधीपासून आपल्या आजपर्यंतच्या वाटचालीत असे काही सहकारी जे आपल्यासोबत राहिलेत, त्यांनी साथ-संगत केली; अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामात सामाजिक संघटना म्हणून मदत केलेली आहे. संघटनेच्या एकूण ध्येयधोरणांशी कटिबद्ध राहून त्यांनी आपापल्या ठिकाणी पाय रोवून या कामाला मदत केली; ते पुढे नेण्यासाठी त्या त्या ठिकाणच्या कार्यकर्त्यांनी सहकार्य केले, मार्गदर्शन केले. अशा सगळ्यांच्याबद्दलची कृतज्ञतेची भावना मनामध्ये आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकर त्यांच्या स्मृतींचा जागर करत असताना काही स्मृती भावनिक, तर काही वैचारिक आहेत. डॉ. दाभोलकरांच्यासोबत १९८६-८७ पासून अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कामातून त्यांचा जो काही परिचय झाला त्यातून त्यांचा कार्यकर्ता ते नेता असा सगळा प्रवास मी अनुभवला आहे. मुख्यतः त्यांच्या प्रभावातूनच मी खूप काही शिकलो आहे. पण मुख्यतः कार्यकर्ता म्हणून आपण 'डाऊन टू अर्थ' असण्याच्या ज्या जाणिवा आपल्याला आवश्यक असतात, त्या देण्याचं आणि त्यांचा आपल्यावर संस्कार करण्याचं काम दाभोलकरांच्यामार्फत झालं.

डॉक्टरांच्या समकालीन महाराष्ट्रातील किंवा देशभरातील अगदी मोजक्याच कार्यकर्त्यांनी स्वतंत्रपणे उभे राहून आपले कार्यकर्तृत्व सिद्ध केले आणि आपल्या कार्याची स्वतंत्रपणे ओळख निर्माण केलेली आहे. त्यातही दाभोलकरांचे व्यक्तिमत्त्व एक कार्यकर्ता, संघटक, समन्वयक, संयोजक इथपासून तर अगदी धोरणी व द्रष्टा आयोजक नेता म्हणून सर्वपरिचित झाले. त्याचबरोबर लेखक आणि संपादक अशा अनेकविध भूमिकांमध्ये डॉ. नरेंद्र दाभोलकर वावरलेले आहेत. त्यांच्या या भूमिका आणि वाटचालीतले टप्पे याकडे तटस्थपणे बघितलं तर त्यांनी काहीतरी जीवितध्येय ठरवलेलं होतं आणि त्यासाठी त्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वात काटेकोर व संयमी बदलही केलेले होते, हेही लक्षात येतं. आहारविहाराच्या सवयींपासून तर पद, पैसा, प्रतिष्ठा, पुरस्कार यांसारख्या प्रलोभनांचा भडिमार सतत होत असतानाही ध्येयाकडील वाटचालीपासून न ढळता आश्चर्य वाटावे इतके तर्ककठोर, निरपेक्ष आचरण हे त्यांचे स्वभाववैशिष्ट होते. कार्यकर्ता म्हणून अशा त्यांच्या कठोर वाटचालीमुळेच अंधश्रद्धा निर्मूलन नावाचं संघटन उभं राहिलं, कार्यकर्ते जोडले गेले. त्या पहिल्या फळीतील काही कार्यकर्ते आजही आपल्यासोबत आहेत.

नंतर संघटनेला कार्यकर्त्यांची दुसरी फळी जोडली गेली; जी एका अर्थाने अधिक व्यापक अंगाने विचार करणारी होती. पहिल्या फळीतील कार्यकर्त्यांना केवळ अभिव्यक्तीसाठी एक मंच हवा होता, तो त्यांना मिळाला.

परंतु दुसऱ्या फळीतील कार्यकर्ते एका वैचारिक अधिष्ठानाच्या भूमिकेतून जोडले गेले. त्यांना समाजवास्तवाचे भान आहे. या दोन्ही फळीतील कार्यकर्त्यांतील परस्परांच्या अनुभवांचे आणि विचारांचे आदानप्रदान करीत, परस्परभावबंध जपत, डॉ. दाभोलकरांच्या हत्येनंतर संघटनेची वाटचाल झालेली आहे. सेनापती गारद झाला की सैन्याची दाणादाण व्हावी तशी अवस्था लोकशाही संविधानिक व्यवस्थेमध्ये अग्रणी नेता गेला की एखाद्या संघटनेची होते. मात्र उद्‌भवलेल्या परिस्थितीची जाणीव ठेवत आपल्याकडे आपण असं होऊ दिलेलं नाही. त्यासाठी आपण किंमत देखील मोजलेली आहे. कार्यकर्त्यांनी वेळ, श्रम, पैसा, आपल्या कुटुंबाच्या सगळ्या भावभावनांची होळीसुद्धा त्यात केलेली आहे; हे विसरता येणार नाही. संघटनेतील अंतर्गत ताणतणाव, त्याचबरोबर राजकीय आणि सामाजिक असे बाह्य दबाव असूनही संघटना समर्थपणे उभी राहिली आणि आपले अस्तित्व सिद्ध केलेले आहे. कदाचित महाराष्ट्राच्या गेल्या ५० वर्षांच्या सार्वजनिक जीवनामध्ये दुसऱ्या कुठल्याही संघटनेचा असा तावूनसुलाखून प्रवास झालेला असेल, असे मला वाटत नाही. यासाठी सर्व कार्यकर्ते सहकारी आणि त्यांच्या पाठीशी उभे असलेले त्यांचे कुटुंबीय हे देखील कौतुकास पात्र आहेत. एका बलिदानावर आपण संघटना म्हणून उभे आहोत याची कार्यकर्त्यांनी, पदाधिकाऱ्यांनी जाणीव ठेवून यापुढे संघटनेला क्षति पोहोचणार नाही अशा पद्धतीचे वर्तन करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांवर आहे.

दाभोलकरांच्या खुनाचा तपास कोणत्या दिशेने, कोणती वळणे घेत आणि कुठवर आला आहे हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे; ते मला येथे सांगावेसे वाटते. महाराष्ट्राचे पोलीस खाते, त्यांचीच एस.आय.टी. म्हणून एक स्वतंत्र यंत्रणा आणि सी.बी.आय. व एन.आय.ए. या दोन केंद्रीय यंत्रणा अशा चार यंत्रणांमार्फत या खुनाचा तपास होत असताना देखील तो पहिली जवळपास दीड, पावणेदोन वर्षे चुकीच्या दिशेने किंवा पारंपारिक पद्धतीने चालला. गांधींचा खून करणाऱ्या विचारसरणीच्या लोकांकडूनच दाभोलकरांचा देखील खून केला गेलेला आहे; अशी तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी खुनानंतरच्या पहिल्या तीन तासांच्या आतच दिशा स्पष्ट केलेली असताना देखील ही दिरंगाई झालेली आहे, ही बाब ध्यानात घ्यावी. कॉ. पानसरेंचा खून झाला त्यावेळीसुद्धा आपण ही जाणीव करून दिली होती. इथे दिरंगाई हा शब्द अगदीच सौम्य आहे; मी तर असं म्हणेन, राजकीय हितसंबंधांमुळे त्या खुनाचा तपास जाणीवपूर्वक टाळला गेला. त्यानंतर कॉ. पानसरे, डॉ. कलबुर्गी, गौरी लंकेश यांचे खून झाले. जेव्हा कर्नाटक पोलीस डॉ. कलबुर्गी, गौरी लंकेश यांच्या खुनाच्या तपासात महाराष्ट्रातील संशयितांपर्यंत पोहोचले, तेव्हा त्यांना श्रेय जाऊ नये आणि आपली निष्क्रियता उघड होऊ नये, यासाठी महाराष्ट्र पोलीस त्या संशयितांना अटक करायला पुढे आले. तरीही महाराष्ट्र पोलिसांनी अजूनही तो तपास काही धसास नेला नाही, याचे तीव्र दुःख आहे. जे सहा लोक आज अटकेत आहेत ते फक्त चेहरे आहेत. परंतु चार खुनांच्या साखळीमधले जे षड्‌यंत्रकारी, सूत्रधार आहेत ते अजूनही मोकाट आहेत.

आजची स्थिती अशी आहे की, तपासयंत्रणांवरचा जो काही न्यायालयीन दबाव होता तो देखील काढून घेतला गेला आहे. सुरुवातीला लोकक्षोभाचा दबाव होता तोही आता फारसा राहिलेला नाही. आता या खूनसत्राच्या तपासाकडे पोलीस किंवा प्रशासकीय यंत्रणेतील एक कागदोपत्रीची नोंद यापलीकडे बघितले जात नाही. माध्यमांमध्येही 'आजची एक बातमी' यापलीकडे या तपासाला स्थान राहिलेले नाही. कुठल्याही जाती, धर्म, पक्षाचे समर्थन किंवा पाठिंबा नसणाऱ्या, महाराष्ट्रभर पोहोचलेल्या एका सामाजिक क्षेत्रातल्या मोठ्या संघटनेच्या नेतृत्वाचा खून होतो, त्या खुनाच्या तपासामध्ये दहा वर्षे उलटून देखील तपासामध्ये काहीही निष्पन्न होत नाही, ही बाब जशी अत्यंत धोकादायक शोकांतिका आहे, तशी ती या देशातील लोकशाही, प्रजासत्ताक संविधानिक व्यवस्थेला आव्हान देणारीही आहे. याचाच परिणाम म्हणजे आपण 'जबाब दो' आंदोलन करीत 'सूत्रधार कोण' याचा जबाब मागत राहिलो; परंतु आता जबाब मिळणे तर दूरच, संविधानिक मार्गाने करायच्या मुंबईतल्या निदर्शनांनाही नुकतीच परवानगी नाकारली गेली. आता प्रश्न विचारायला देखील मुस्कटदाबी केली जात आहे; हे आपल्याला समजून घ्यावे लागेल. अशा परिस्थितीत आता आपण खंत बाळगणे, निषेध करणे, सरकारला जाब विचारणे, समाजाकडून व माध्यमांकडून पाठबळाची अपेक्षा करणे

एवढे पुरेसे नाही. लोकशाहीमध्ये आपल्या अस्तित्वाची, विवेकी आवाजाची दखल कशी घेतली जाईल, याचेच मोठे आव्हान आहे. तरीही 'जबाब दो' आणि इतर आंदोलनांच्या माध्यमातून या खूनसत्राच्या पाठीशी कुठली प्रतिगामी विचारधारा आहे, हे जगाला सांगण्याचे काम आपण करू शकलो आहोत.

आजचे सामाजिक, राजकीय वातावरण भय, भ्रम आणि भूक या त्रिसूत्रीचा आधार घेऊन कलुषित केलं जातं आहे. अशा वास्तवात अंधश्रद्धा निर्मूलनाचा विचार हा केवळ सामाजिक, सामूहिक शहाणपणाचा विचार न राहता त्याला राजकीय शहाणपणाची जोड दिली गेली पाहिजे. आजपर्यंत सामाजिक कामांचा राजकीय भूमिकांशी संबंध जोडणे वर्ज्य मानले जात होते. परंतु अलीकडे सामाजिक आणि राजकीय बदलांचा परस्परसंबंध आणि परिणाम पाहता सामाजिक कामांना राजकीय आयामसुद्धा असतो हे मान्य करून व्यवस्था परिवर्तनाची मांडणी होते आहे. त्यामुळे आपल्याला राजकीय भूमिकांबाबत अनभिज्ञ राहून चालणार नाही. भारतीय संविधानातल्या समता, स्वातंत्र्य, बंधुता, सामाजिक न्याय, वैज्ञानिक दृष्टिकोन ही भारतीय नागरिकांची कर्तव्ये जी आहेत, जी मूल्ये आहेत, त्याच आपल्यासाठी राजकीय भूमिका आहेत. यासाठी संघटना म्हणून किंवा व्यक्ती म्हणून आपण प्रत्यक्ष निवडणुकीच्या राजकारणात उतरणार नसलो, तरी या मूल्यांचा विचार, त्याविषयीची भूमिका व चर्चा, त्यांची अंमलबजावणी, त्यानुसार कृतिकार्यक्रम राजकीय पटलावरून होणे याबाबत आपल्याला आग्रही राहावे लागेल. आपले कार्य भोंदूबाबांचा भांडाफोड, भानामती सोडवणे, डाकीणमुक्ती, जातपंचायतींना मूठमाती एवढ्यापुरते मर्यादित नसून विवेकी समाज निर्माण करण्यापर्यंत आपल्या कार्याचा अवकाश विस्तारावयाचे आपले उद्दिष्ट आहे. गेल्या दशकभरात हा अवकाश विस्तारला तर नाहीच, उलट तो सत्तेतील राजकारण्यांच्या विचारसरणीमुळे दिवसेंदिवस आक्रसत गेलेला आहे. आपला अवकाश आकुंचित करणारी राजकीय व्यवस्था सत्ताबाह्य होईल अशी ठाम भूमिका संघटना म्हणून आपल्याला घ्यावी लागणार आहे. पुढच्या वाटचालीसाठी संघटना म्हणून आपल्याला समविचारी नागरी संस्था व संघटनांशी संपर्क, संवाद, समन्वय, सहभागाने जोडून घ्यावे लागणार आहे. कर्नाटकातल्या नागरी संस्था-संघटनांनी याबाबत सक्रिय भूमिका घेत अपेक्षित राजकीय बदल घडवून आणून आपल्यापुढे एक आशावाद निर्माण केलेला आहे.

आज महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीला अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यातील राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रवर्तक संघटना (Pioneer Organisation) म्हणून जी मान्यता मिळालेली आहे, त्याचे महत्त्व लक्षात घेऊन आपले या स्तरांवरील अस्तित्व टिकवण्याची, वाढवण्याचीदेखील गरज आहे. यासाठी मी माझ्यापरीने या सगळ्या प्रक्रियेमध्ये संवाद, संपर्क, करायचा प्रयत्न करतो आहे. संघटनेतील सहकारी, कार्यकर्ता, पदाधिकारी अध्यक्ष म्हणून मी अपेक्षेनुसार, गरजेनुसार आपल्यासोबत असणारच आहे. परंतु त्याच्याही पलीकडे संघटनेसोबतच्या अनेक समसंवादी प्रक्रियांमध्ये देखील सहभागी आहे. आवश्यक असेल त्या ठिकाणी आपणही सहभागी व्हावे असं आवाहन करतो. आज आपल्याला या ठिकाणी एकत्र येणं आणि सगळ्यांनी एकमेकांशी बोलणं याचा जो अनुभव आपण घेतला, अनुभूती घेतली, त्याबद्दल आनंद व्यक्त करतो.

शब्दांकन – प्रल्हाद मिस्त्री

•

## वाचकांच्या प्रतिक्रिया

ऑगस्ट २०२३ अंनिस पत्रिका मिळाली धन्यवाद शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचे बहुआयामी व्यक्तिमत्व व त्यावर विविध अंगाने प्रसिद्ध झालेले लेख वाचले. आदरणीय डॉ. दाभोलकरांच्या बाबतीत ज्ञान व माहिती भरपूर मिळाली. एक अलौकिक व्यक्तिमत्व त्यांचा त्याग व झालेले बलिदान खूपच महान आहे. अद्यापही समाजामध्ये भरपूर मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धा जागोजागी आढळतात. त्यामुळे या क्षेत्रात काम करण्यास युवकांनी पुढे यावे असे मी आवाहन करतो. तसेच कायदेशीर सामाजिक वैज्ञानिक माहिती घेऊनच पुढे जावे लागेल हे निर्विवाद सत्य अंक खूप आवडला एका डोळ्यात अश्रू तर दुसऱ्या डोळ्यात आनंद अशी परिस्थिती ऑगस्टमध्ये आहे. चला सर्वजणांनी पुढे जाण्यासाठी नवा विचार वैज्ञानिक दृष्टिकोन व पुरोगामी विचार वाढवूया

**प्राचार्य डॉ. अशोकराव ढगे, अहमदनगर**



# धर्मांधतेच्या आव्हानाशी लढावे लागेल

**रझिया पटेल**
९८२३०७४०५४

**महा.अंनिसच्या वतीने शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या दहाव्या स्मृतिदिनानिमित्त २० ऑगस्ट २०२३ रोजी पुणे येथे आयोजित विवेक निर्धार मेळाव्यात रझिया पटेल यांनी केलेले भाषण.**

आजचा कार्यक्रम अतिशय चैतन्यदायी आणि स्फूर्तिदायी आहे, असं मला अगदी मनापासून जाणवतंय. आजच्या दिवशी डॉ. दाभोलकरांना अभिवादन करताना आपण स्वतःलाच एक वचन देतो की, हा लढा आम्ही पुढे चालवू. मी चळवळीत आले तेव्हा डॉ. दाभोलकर आम्हाला शिबिरांमध्ये मार्गदर्शन करायचे. त्यावेळी अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा उदय झालेला नव्हता. एखाद्या चळवळीमध्ये असो वा इतरत्र असो, कार्यकर्त्यांच्या बाबतीत अनेकदा असं होतं की, आम्हाला समाज बदलायचाय, आमच्याकडे त्याचा आराखडा आहे, त्यामुळे आम्ही काय सांगतोय ते समाजाने ऐकून घ्यावं; असं बऱ्याचदा जाणवतं. पण त्याउलट कितीही लहान कार्यकर्ता असो, तो काय म्हणतोय हे अतिशय महत्त्वाचं आहे असं जाणवून देऊन दाभोलकर अक्षरशः गंभीरपणे, शांत बसून, त्याला मध्ये न थांबवता, त्याचं सगळं ऐकून घ्यायचे, हेच त्यांचे पहिले स्वभाववैशिष्ट्य असावे ज्यामुळे अंधश्रद्धा निर्मूलन समिती इतकी वाढली. दाभोलकरांचा खून झाला; खेडोपाडी, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये लोक रडले. तेव्हा दुसरं जे खूप कालावधीनंतर जाणवलं ते असं की, चळवळीतला हा कार्यकर्ता कुठवर पोहोचलेला होता. बाबा (आढाव) जे आता म्हणाले की, समाजाशी संवाद, त्याचा अर्थ इथे कळतो. आपण प्रतिगाम्यांना, धर्मांधांना प्रतिक्रिया देतो, तात्कालिक ते आवश्यकही असलं तरी समाजाशी संवाद साधण्यासाठी दाभोलकरांनी एक वस्तुपाठ घालून दिला आहे. तिसरं म्हणजे चळवळीमध्ये त्यांनी इतक्या विविध कल्पना, उपक्रम राबवले; ज्यामुळे चळवळ इतकी वाढत गेली. चळवळीच्या सुरुवातीपासून माधव बावगेजी त्यांच्यासोबत आणि अविनाश (पाटील) तर कायम सावलीसारखा त्यांच्याबरोबर असलेला मी पाहिला. महाराष्ट्रातल्या सर्व भागांमधून, अगदी खेड्यापाड्यातून येथे इतके युवक कार्यकर्ते आलेले आहेत; हेच समाजाशी संवाद असण्याचं एक चिन्ह आहे. त्यामुळे बाबा म्हणाले तसं, आजच्या निराशावादी परिस्थितीमध्ये खूप आशावादी असं हे वातावरण आहे.

डॉ. दाभोलकर, कॉ. पानसरे, डॉ. कलबुर्गी, गौरी लंकेश यांचे गोळ्या घालून खून करण्यात आले. या कालखंडात महाराष्ट्रच नाही तर संपूर्ण देश हादरला. डॉ. दाभोलकरांना धमक्या यायच्या. परंतु बऱ्याचदा असं होतं की, आपला लोकशाहीवर, विचारांच्या आदान-प्रदानावर विश्वास असतो आणि त्यामुळेच कदाचित आपण गाफीलही राहतो. परिणामी, गेल्या दहा वर्षांत गांधीजींचा खून करणारी ही नथुरामी प्रवृत्ती सक्रिय झालेली आहे; ही विषवल्ली फोफावलेली आहे. म्हणून हे लागोपाठ खून घडणं इथपासून तर त्यांचं सत्तेत जाऊन बसणं इथपर्यंत त्यांचा हा भयंकर प्रवास आपल्याला दिसतोय. त्यातून अजून एक धोकादायक प्रकार झालेला आहे की, गांधीजींना गोळी घालणारा नथूराम ब्राह्मणी प्रवृत्तीचं प्रतीक होता. आता मात्र त्यांनी बंदुका बहुजन समाजाच्या मुलांच्या हातात दिलेल्या आहेत; त्यांना शस्त्र उचलायला लावताहेत. या अतिशय धोकादायक नि गंभीर प्रकाराबाबत आपण वेळीच सावध झालं पाहिजे. नथुरामी प्रवृत्तीशी कसे लढायचे याबाबत आणखी सखोल आणि ठोस विचार करावा लागणार आहे; हे एक मोठे आव्हान आहे. कारण असं दिसतंय की, देशभर नथुरामची मंदिरे उभारण्यातून, त्या विचारांच्या प्रचार, प्रसारातून समाजाला हिंसक बनविले जाते आहे. आणि अशी हिंसा की, ज्या पोलिसाचं काम आहे जनतेचं रक्षण करणं, तोच रेल्वे पोलीस नावं विचारून प्रवाशांना गोळ्या घालतो. अशी परिस्थिती फक्त एका

समाजाच्या बाबतीत चाललेली आहे, या भ्रमात राहू नये. परवा मी एक बातमी वाचली, ज्या व्यक्तीने भररस्त्यात मोहसीन शेखचा खून केला, कोर्टाने त्याला निर्दोष सोडला; त्याच्याच विषयी दुसरी बातमी होती की, तो गुंडगिरी करून काही शेतकऱ्यांच्या जमिनी लुबाडू पाहातोय म्हणून मध्यमवर्गाने, विशेषतः हिंदू मध्यमवर्गाने फार भ्रमात राहू नये. कारण हीच हिंसा आता संपूर्ण समाजात आतमध्ये वळणारच आहे. हा धोका आत्ताच ओळखून सावध झालं पाहिजे.

आज आपल्यासमोर गंभीर आव्हान काय आहे? चळवळीमध्ये आम्हाला दोनच ओळींचं एक गाणं होतं, 'गरीब वो है इसलिये की, एक तुम अमीर हो गये; एक बादशाह हुआ, तो सौ फकीर हो गये', तर यातही एक कार्यकारणभाव आहे. बुवाबाजी, भानामती या गोष्टींचा कार्यकारणभाव सांगत आपण लोकांचे प्रबोधन करतो, त्यांना विवेकी बनवतो. त्यातून आपण लोकांमध्ये अंधश्रद्धा निर्मूलन समितीबद्दल खूप जवळीक, आकर्षण निर्माण केलं. आता मात्र धोका अतिशय गंभीर आहे. आपल्याला तेवढं भाबडं राहून चालणार नाही; कारण राज्यसत्तेच्या मोठ्या पाठबळाने अंधश्रद्धा राज्यपुरस्कृत होत चाललेल्या आहेत. याआधी राज्यसत्तेला संविधानाबद्दलचा एक आदर, आपली कर्तव्ये नि मूल्ये काय आहेत, याच्याबद्दल थोडीशी जाणीव असायची. आज अशी परिस्थिती आहे की, अवैज्ञानिक व राष्ट्रपिता गांधीजींबद्दल अत्यंत आक्षेपार्ह विधाने करणाऱ्या मनोहर भिडेला अटक होणे तर सोडाच, त्याला राज्याचे उपमुख्यमंत्री 'ते आमचे गुरुजी आहेत' असं सांगत त्याच्याविषयी आदर नि समर्थन व्यक्त करतात. आता राजकीय लोक बेमुर्वतपणे बागेश्वर बाबासारख्यांच्या बुवाबाजीचं समर्थन करू लागले आहेत. हे राजकीय पुढारी हिंदुत्ववादी विचारसरणीचेच असणं हा काही योगायोग नाही. आता अंधश्रद्धांचं स्वरूप केवळ रुद्राक्षं विकणं, खडे विकणं एवढ्यापुरतं मर्यादित राहिलेलं नाही. बागेश्वर बाबा घोषणा देतो, 'सब हिंदू एक हो जाओ और हथियार हाथ में ले लो'. आता हे असे बाबा लोक त्यांची तथाकथित धार्मिकता, आध्यात्मिकता नि त्यांचं अर्थकारण याच्याही पलीकडे गेलेले आहेत. जेव्हा अंधश्रद्धांच्या आणि आनुषंगिक शोषणाच्या विरोधात लढणाऱ्या डॉ. दाभोलकरांच्या खुन्यांना अटक होत नाही, त्यातून राजकीय इच्छाशक्ती कोणाच्या बाजूने पक्षपाती आहे हे स्पष्ट होतं. राज्यपुरस्कृत अंधश्रद्धांशी उभा राहणारा हा नवा लढा आहे आणि तो लढणं हे अत्यंत जोखमीचं काम आहे. त्यामुळे अंधश्रद्धांच्या बाजूने पक्षपाती असलेल्या राज्यव्यवस्थेच्या विरोधात उभं राहावं लागणार आहे. डॉ. दाभोलकरांनी एका लेखात स्पष्ट केले होते की, 'अंधश्रद्धाविरोधी कायदा हा हिंदूविरोधी असल्याने तो रद्द करा असं म्हणणारे आणि मी हिंदू हितरक्षक आहे म्हणून मला निवडून द्या', असं म्हणणारे लोक वस्तुतः एकच आहेत. याबाबत आपल्या बोलण्यातही आणि विचारातही स्पष्टता आणावी लागेल, त्याच्याशिवाय आपला लढा बळकट होणार नाही; असंही त्या लेखात डॉ. दाभोलकरांनी सूचित केलं होतं. त्यामुळे अंधश्रद्धेचा लढा आता फक्त सामाजिक प्रबोधनाचा लढा उरलेला नसून, अंधश्रद्धांना उघडपणे खतपाणी घालणाऱ्या अत्यंत क्रूर राज्यसत्तेच्या विरोधातला लढा आहे. हा निर्णायक लढाच मानवसमाज म्हणून आणि देश म्हणून आपलं भवितव्य ठरविणार आहे.

हा लढा अधिक आव्हानात्मक यामुळे बनला आहे की, शिक्षित, उच्चशिक्षित आणि मध्यमवर्ग मोठ्या प्रमाणावर या अंधश्रद्धांच्या पाठीशी उभा राहिलेला आहे. शिक्षणाचा उद्देशच आधुनिक मूल्ये देण; असा असूनही मात्र ती मूल्ये शिक्षकांच्या गावीही नसतात. केवळ सरकारचे नोकर बनविण्यासाठी जशी मेकॉलेची शिक्षणपद्धती होती तशी आता हिंदुत्ववादी शिक्षणपद्धती येते आहे. त्यात जनतेने पूर्णपणे अंधश्रद्ध होऊन आंधळेपणाने हिंदुत्ववादाचा जप करावा, हा उद्देश आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षणातील धर्मनिरपेक्षतेचे जे अनेक उपक्रम दूरदृष्टीने दाभोलकरांनी राबवले ते अत्यंत मोलाचे वाटतात. वैज्ञानिक दृष्टिकोन आणि माणुसकीची मूल्ये जपणारे भावी नागरिक घडवले जातील, अशी आमची शिक्षणपद्धती असावी.

अंधश्रद्धांचं राजकारण रुद्राक्ष आणि खड्यांच्या पलीकडे कसं गेलं? आज मुस्लीम समाजाविरुद्ध विद्वेषपूर्ण आणि भयनिर्मिती करणाऱ्या भाषणांची मोठी मोहीम चालू आहे. ही भीती तुमच्या मेंदूत निर्माण केल्यानंतर तुमचा विवेक काम करेनासा होतो. संपूर्ण समाज भयग्रस्त झाला की, रेल्वेमध्ये माणसांना गोळी झाडण्याचं काम काहीही विचार न करता, काहीही कार्यकारणभाव न शोधता केलं

जातं. शत्रू आज मुसलमान आहेत, उद्या कुठले तरी जातीसमूह असतील, दुसरा धर्म असेल. समाजामध्ये भयनिर्मिती करून एकमेकांविरुद्ध लढवणे यातला सामाजिक, राजकीय आणि आर्थिकदृष्ट्या असलेला संपूर्ण कार्यकारणभाव समजून घ्यावा लागणार आहे. डॉ. दाभोलकर असेही म्हणाले होते की, अंधश्रद्धांच्या शस्त्राचा गरजेनुसार प्रभावी वापर हे मूलतत्त्ववादी आणि क्रूर फॅसिस्ट करतात; हे आजच्या परिस्थितीत प्रकर्षाने लक्षात घेण्यासारखे आहे. त्यामुळे गरजेनुसार वापर करण्यासाठी देशभर तथाकथित आध्यात्मिक बुवांचा सुळसुळाट झालेला आहे. बलात्काराच्या गंभीर गुन्ह्यात शिक्षा झालेला राम–रहीम निवडणुका आल्या की पॅरोल मिळून बाहेर येतो. त्यामुळे हे भोंदूबाबा राजकारण्यांच्या हातातील प्रभावी शस्त्रे बनलेली आहेत. ही खुनशी आणि बेरकी मंडळी आपल्या रक्ताळलेल्या कट्यारीवर धर्माच्या भावूकतेची, संस्कृती संवर्धनाची झूल साळसूदपणे मिरवत असतात आणि त्यालाच लोक फसतात. त्यामुळे सर्वसामान्यांच्या सद्सद्विवेकबुद्धीला जर आपण जागृत केलं तर मग त्या विकृती विराधास जी जनशक्ती, ऊर्जा उभी राहील, त्याची तुलना कशाशीही होऊ शकत नाही. म्हणून अंधश्रद्धा निर्मूलनाचा लढा फक्त बुवाबाजीच्या विरोधापुरता मर्यादित न ठेवता तो डॉ. दाभोलकरांनी शिक्षणातील धर्मनिरपेक्षता, शिक्षकांचे प्रशिक्षण, आंतरधर्मीय आणि आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन, जातपंचायतींना मूठमाती अशा अनेक उपक्रमांनी समग्र केला. परंतु या लढ्याबाबत लोकप्रतिनिधींची स्तब्धता भयावह असून ती आपल्या समाजाला भविष्यात कुठे घेऊन जाईल, याबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली होती. म्हणून आपल्याला परिस्थितीचे समग्र आकलन असले पाहिजे.

अंधश्रद्धा निर्मूलनापासून सुरू झालेला हा लढा पुढे इतका समग्र, इतका व्यापक झाला. कारण त्या दृष्टीची आणि त्या पद्धतीच्या लढ्याची गरज आहे हे दाभोलकरांनी ओळखले होते. त्याच पद्धतीची विचारसरणी त्यांनी विकसित करीत नेली. ‘थिंक ग्लोबली ॲक्ट लोकली’ या धोरणानुसार एकीकडे कार्यकर्ते सामूहिक पातळीवर तर दुसरीकडे आपापल्या आवडीनुसार आणि क्षमतेनुसार व्यक्तिगत पातळीवर समाजाच्या विविध गरजांच्यानुसार कार्यक्रम राबवतील हा दृष्टिकोन डॉक्टरांनी दिला. ते म्हणत की, अंधश्रद्धा निर्मूलनाची चळवळ ही अंधश्रद्धा निर्मूलन ते शास्त्रीय विचारपद्धती, शास्त्रीय विचारपद्धती ते वैज्ञानिक दृष्टिकोन, वैज्ञानिक दृष्टिकोन ते धर्मचिकित्सा, धर्मचिकित्सा ते धर्मनिरपेक्षता, आणि धर्मनिरपेक्षता ते विवेकवाद व मानवतावाद; अशी वाटचाल करेल. अशा एका दृष्टिक्षेपात त्यांनी लक्ष्य आणि त्याची दिशा कार्यकर्त्यांच्यासमोर वेळोवेळी ठेवली. ही त्यांची दूरदृष्टी पाहून एकदम थक्क व्हायला होतं. त्यांच्यासोबत केलेल्या प्रवासातही वेगवेगळ्या विषयांवर ज्या पद्धतीने ते संवाद साधायचे त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वसमावेशकता दिसून येत असे. त्यांनी दिलेला हा सगळा वस्तुपाठ बघता, मला असं वाटतं की, दाभोलकर ही एक ‘स्कूल’ आहे, एक विद्यापीठ आहे. या ‘स्कूल’चे पाठ घेण्याची आपल्याला आणि संपूर्ण समाजाला अतिशय निकड आहे. कारण बऱ्याचदा समस्या हाताळायला घेतली जाते, परंतु जेव्हा त्याबद्दलची वैचारिक स्पष्टता नसते तेव्हा त्या समस्येवरील आंदोलने कमकुवत होतात. धर्मांधतेविरोधात लढताना आपण कोणासोबत जायचं, आपली नि त्यांची विचारसरणी यांची स्पष्टता असली की, धर्मांध संघटना कुठल्याही समाजाची असो त्यांच्यासोबत आम्ही जाणार नाहीत; असा पवित्रा घेतला तरच तो लढा बळकट करत नेता येईल.

अली सरदार जाफरी यांच्या स्वातंत्र्य चळवळीच्या ज्या विद्रोही कविता आहेत; त्यातील एका कवितेत ते म्हणतात –

‘गरजती है तोपें, गरजने दो इनको
दुहुल बज रहे है, तो बजने दो इनको
जो हथियार सजते हैं, सजने दो इनको
बढ़ेंगे, अभी और आगे बढ़ेंगे!
हुकूमत के पिंदार को तोड़ना है,
असीरो–गिरफ्तार को छोड़ना है,
जमाने की रफ्तार को मोडना है,
बढ़ेंगे, अभी और आगे बढ़ेंगे!’

आपला जो निर्धार आहे त्याचं साधर्म्य स्वातंत्र्य चळवळीच्या या गीतात मला जाणवतं.

शब्दांकन – राजेंद्र फेगडे

●

# अजूनही विस्तारायचे आहे



**माधव बावगे**
९४०४८७०४३५

आजच्या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, प्रमुख वक्ते, प्रसिद्ध लेखक आणि राष्ट्रीय एकात्मतेचा विचार जपणारे आदरणीय राम पुनियानीजी, आदरणीय रझिया पटेल आणि आदरणीय हेमंत देसाई. आज स्मृतिजागर अभिवादन मूक मोर्चा आणि विवेक निर्धार मेळाव्याच्या निमित्ताने संपूर्ण महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यांतील उपस्थित असलेले माझे संघटनेचे साथीदार, सर्व समविचारी संस्था संघटना यांचे प्रतिनिधी आणि साथी मित्रहो, ऑगस्ट महिना आला की, खरं तर आम्हाला एका बाजूला संघटनेचा वर्धापनदिन ९ ऑगस्ट रोजी असतो म्हणून आनंदाचा आणि दुसऱ्या बाजूला आमच्या संघटनेचा नेता, डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचा खून याच पुण्यामध्ये २० ऑगस्ट, २०१३ रोजी झाला याचे दुःख आहे. त्या घटनेला दहा वर्षे पूर्ण होऊन गेलेली आहेत. अजूनही सूत्रधारांना पकडण्याच्या बाबतीत शासनयंत्रणा काहीही करू शकली नाही. त्यानंतर १६ फेब्रुवारी, २०१५ रोजी कामगारांचे, कष्टकऱ्यांचे नेते कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्यावर गोळ्या झाडल्या गेल्या आणि २० फेब्रुवारी, २०१५ रोजी त्यांचा मृत्यू झाला. तसेच महात्मा बसवेश्वरांचा वास्तववादी विचार, देवधर्माच्या पलीकडे घेऊन जाऊन मानवकेंद्रित धर्म सांगण्याचा वचनसाहित्याच्या माध्यमातून प्रयत्न करणारे डॉ. एम.एम. कलबुर्गी यांचाही ३० ऑगस्ट, २०१५ रोजी त्यांच्या घरामध्ये खून करण्यात आला. पत्रकारितेच्या संदर्भात सर्व धर्मांध शक्तींच्या विरोधामध्ये आपल्या लेखणीच्या माध्यमातून लोकांना जागृत करणाऱ्या गौरी लंकेश यांचा त्यांच्या घराजवळ खून करण्यात आला. अशा पद्धतीने पुरोगामी परिवर्तनवादी विचारांची मुस्कटदाबी करण्याचा प्रयत्न चाललेला आहे, त्याविरुद्ध आपण सारे आवाज उठवित आहोत. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या खुनाच्या सूत्रधारांना पकडण्याच्या बाबतीत अजूनही काहीही पावले सरकारने उचललेली नाहीत. त्यामुळे सातत्याने महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने आपण प्रयत्न करतो आहोत. न्यायालयाची लढाई लढतोय. न्यायालयाच्या संदर्भामध्ये सांगायला हरकत नाही की डॉक्टरांचा खून झाल्यानंतर न्यायालयीन प्रक्रियेमध्ये कुटुंबीयांनी लक्ष घालायचे आणि जनतेच्या दरबारात आणि रस्त्यावरची लढाई संघटनेच्या वतीने लढायची, अशा पद्धतीने न्यायासाठी संघर्ष करावा. न्यायालयीन पातळीवरही आज दहा वर्षे झाली, अजून मारेकऱ्यांना शिक्षा झालेली नाही. त्यांच्या सूत्रधारांनाही शिक्षा झालेली नाही. संघटनेच्या वतीने हा लढा सातत्याने जिल्हा, शाखा, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर धरणे, मोर्चे, पंतप्रधान आणि राष्ट्रपती यांना निवेदने देणे या पद्धतीने दिलेला आहे. त्याचबरोबर मुंबई, दिल्लीलासुद्धा धरणे, आंदोलने सातत्याने केलेली आहेत. तिथेसुद्धा मोर्चा काढलेला आहे. तरीही या शासनाला अजूनही जाग आलेली नाही. खरं तर, त्यांची इच्छाशक्तीच दिसत नाहीये. महाराष्ट्र पुरोगामी म्हटला जातो आणि त्या पुरोगामी महाराष्ट्रामध्ये पुरोगाम्यांचे खून केला जातात, तरीही इथली शासनयंत्रणा थंड आहे.

**महा.अंनिसच्या वतीने शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या दहाव्या स्मृतिदिनानिमित्त २० ऑगस्ट २०२३ रोजी पुणे येथे आयोजित विवेक निर्धार मेळाव्यात राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांशी साधलेला हा संवाद.**

हे जे चार खून झालेले आहेत, त्या व्यक्ती काय करत होत्या? त्यांचा काय गुन्हा होता? हे फक्त लोकांना शहाणे करत होते आणि म्हणून त्यांचा खून करण्यात आलेला आहे. आजही त्यावर इथलं सरकार शांत आहे. त्याबद्दल आपण काय करायचं? आता तर पोलीसयंत्रणेलासुद्धा धमक्या येताहेत असं मागे जाहीर केलं गेलं. पोलीसयंत्रणाच या ठिकाणी त्यांचे स्वतःचे संरक्षण करण्यासाठी सक्षम आहेत का नाही? मग अशा परिवर्तनवादी, पुरोगामी विचारांच्या लोकांच्या होणाऱ्या खुनांच्या संदर्भामध्ये ते काय करणार आहेत?

संघटनेच्या पातळीवर काम करत असताना डॉक्टरांना कधीही कुणाची भीती वाटली नाही. चळवळीमध्ये काम करत असताना त्यांना अनेक धमक्या आल्या, धमकीची पत्रे आली. ते सांगायचे, अशी पत्रे येत असतात. आपण कुणाचं काय घोडं मारलंय? आपल्याला काय, आपण लोकांना शहाणे करण्याचे काम करतो. आपल्याला कसली भीती आली आहे? असे सांगून ते आलेले पत्र फाडून टाकायचे. परंतु अलीकडे राजकारणी लोकांनासुद्धा सातत्याने संरक्षण असूनही, ते जनतेची कामे करत असतानासुद्धा त्यांना संरक्षणाची काय गरज आहे? ते सुद्धा सुरक्षित राहिलेले नाहीत. देशाच्या दोन पंतप्रधानांचे खून झालेले आहेत. म्हणून मित्रहो, या संदर्भामध्ये महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा लढा एका बाजूला चालू असताना संघटनात्मक सक्षमीकरणही चालू आहे. डॉ. दाभोलकर होते तेव्हा महाराष्ट्रात संघटनेच्या शाखा १८० ते २०० होत्या. आज महाराष्ट्रातल्या ३६ जिल्ह्यांमध्ये ३५० पेक्षा अधिक शाखा आहेत. शाखांच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये आपले कार्यकर्ते स्वतःच्या खिशातला पैसा खर्च करून, पदरमोड करून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये लोकांना शहाणं करण्याचं काम या चळवळीच्या माध्यमातून करतात. आता सध्या आमच्यापुढे अनेक मोठी आव्हाने आहेत. धर्मांध शक्तींचा उन्माद वाढतो आहे. त्याचबरोबर बुवाबाजीही, विशेषतः आध्यात्मिक बुवाबाजी अधिक मोठ्या प्रमाणात वाढते आहे. आमचं तर असं म्हणणं आहे की, शासन पुरस्कृत बुवाबाजी वाढते आहे. या संदर्भामध्ये बागेश्वर धाम महाराजाच्या संदर्भात असो किंवा अनेक रुद्राक्ष दिल्यानंतर कुबेर बनवणारे असोत. अशा बाबांच्या विरोधात त्या-त्या ठिकाणी आपल्या कार्यकर्त्यांनी पोलिसांना निवेदने दिली आहेत आणि हे भारतीय राज्यघटनेच्या विरोधामध्ये कृत्य करतात, शासनाने मंजूर केलेल्या जादूटोणाविरोधी कायद्यांतर्गत गुन्हे करतात, त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे अशा मागण्या केल्या आहेत. तरीही त्यावर काहीही ॲक्शन घेतली जात नाही. याचा अर्थ, ही बुवाबाजी शासनपुरस्कृत आहे असा होतो.

धर्मांध शक्ती अधिक मोठ्या प्रमाणात वाढत आहेत म्हणून पुरोगामी, परिवर्तनवादी विचाराच्या कार्यकर्त्यांना सातत्याने अनेक अडथळ्यांना पार करत संघटनेचे काम करावे लागते. हे सगळं करताना कितीही संकटे आली तरी 'संकटे दही दिशा.....' हे गाणे आठवते. अशा संकटांवर आपण सातत्याने कार्यकर्ते म्हणून मात करून संघटनात्मक काम अधिक बळकट कसे करता येईल आणि संघटनेला पुढे घेऊन जाता येईल या पद्धतीने विचार करतो आहोत. संघटनेला निश्चितच भावी पिढ्यांचा विचार करायचाच आहे. भावी नियोजनाबद्दलचा विचार करायचा आहे. परंतु सध्याच्या स्थितीमध्ये संघटना मजबूत करण्यासाठी आपल्याला काम करायचे आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकर संघटनेच्या संदर्भामध्ये काय म्हणाले होते हे आपल्या कार्यकर्त्यांसाठी आणि सर्वांसाठी तसेच कुठल्याही संघटनेसाठी अधिक महत्त्वाचं वाटतं. ते म्हणाले होते, व्यक्तीपेक्षा संघटना ही श्रेष्ठ असते. संघटना आपले वैचारिक भरणपोषण करते. संघटना आपली आई आहे, अशी भावना आपली असली पाहिजे. व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेसाठी संघटनेशी प्रतारणा केली जाऊ नये अथवा संघटनेचा वापरही होऊ देऊ नये. व्यक्ती आपल्या प्रेरणा असू शकतील; पण आपली बांधिलकी संघटनेशी असावी लागते. त्याचबरोबर कोणत्याही व्यक्तीशी झालेले मतभेद, दुरावा याचा कोणताही परिणाम संघटनेच्या कामावर होणार नाही, याची दक्षता घेतली पाहिजे.

अतिशय प्रतिकूल परिस्थिती असूनसुद्धा संघटना आपल्या पायावर भक्कम उभी आहे. ३३-३४ वर्षांमध्ये जे काही कार्यकर्त्यांनी जमा केले होते ते एका बाजूला गेलेलं असलं, तरीही! संघटनेच्या कार्यकर्त्यांचा मला खूप अभिमान वाटतो. आर्थिक पाठबळ नसताना ही संपूर्ण महाराष्ट्रामध्ये अतिशय चांगल्या पद्धतीने संघटनेचे काम हे कार्यकर्त्यांच्या बळावर चालतं. संघटना ही कार्यकर्त्यांच्या बळावर वाढते. संघटनेचे अर्थकारणही कार्यकर्त्यांच्या बळावर वाढतं आणि अशा पद्धतीचे कार्यकर्ते हे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीमध्ये आहेत. डॉक्टरांच्या पठडीमध्ये तयार झालेले कार्यकर्ते आहेत म्हणूनच खऱ्या अर्थाने ही संघटना आजही त्याच ताकदीने संपूर्ण महाराष्ट्रामध्ये काम करते आहे आणि यापुढेही अशाच पद्धतीने काम करीत राहील. संघटनात्मक बळकटी आणि डॉक्टरांचे मारेकरी आणि त्यांचे मास्टरमाईंड यांना जोपर्यंत शिक्षा होत नाही तोपर्यंत आंदोलनाची भूमिका एका बाजूला राहील. दुसऱ्या बाजूला संघटनेच्या वाढविस्तारासाठी काम करत राहायचे आहे. खूप मोठ्या संख्येने महाराष्ट्रातून आणि पुण्याच्या जवळच्या भागातून आपण आलेला आहात. आपल्या सगळ्यांचे मनःपूर्वक स्वागत करतो आणि या ठिकाणी थांबतो.

'जय हिंद, जय भारत!'

●

# झाडाच्या मुळ्यांनी घेतला नागाचा अवतार



**रविंद्र पाटील,** नंदुरबार
८५५२९४४१७३

मी शिक्षक म्हणून गेल्या चोवीस वर्षांपासून माध्यमिक विद्यालयात ज्ञानदानाचे कार्य करीत आहे. आमचा नंदुरबार जिल्हा आदिवासी जिल्हा म्हणून ओळखला जातो. या भागात डाकीण हा प्रश्न मोठ्या प्रमाणात दिसून येतो. त्याबाबत अनेक तक्रारी आमच्याकडे येत असतात. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी २००५ मध्ये केंद्रीय गृहराज्यमंत्री श्री. माणिकरावजी गावीत यांच्या अध्यक्षतेखाली पोलीस पाटलांची एक परिषद आयोजित केली होती. त्यावेळी या प्रश्नावर सविस्तर चर्चा घडवून पोलीस पाटलांनी जबाबदारी घेऊन भूमिका घ्यावी असे सांगितले गेले, तरी देखील नंदुरबार जिल्ह्यात प्रबोधन करून सुद्धा लोकांच्या मनातून डाकीण असते हा विचार अजून तरी निघालेला दिसत नाही. आदिवासी भागात नोकरी करीत असताना मला वेळोवेळी अनेक अंधश्रद्धांची प्रकरणे ऐकायला व पाहायला मिळाली. असाच एक नवीन प्रकार मला अनुभवायला मिळाला. माझी बदली जून महिन्यात लंगडी भवानी या शाळेवर झाली. हे गाव शहादा शहरापासून ३० किलोमीटर अंतरावर असून रस्त्याची व्यवस्थित सुविधा नसलेले हे गाव आहे. अजूनही शिक्षणाची अनास्था असलेली अनेक मुलं दिसून येतात. गावात एस.टी. बस फक्त दोनच वेळा येत असते. गावात जिल्हा परिषद व माध्यमिक शाळा आहेत. वीजपुरवठा नियमित चालू असलेला कधीच दिसला नाही. शेती, पशुपालन करून येथील लोक आपला उदरनिर्वाह करीत आहेत. या गावात पावरा समाजाची माणसं राहातात.

मी अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे काम करतो; हे माझ्या सर्व सहकारी बंधूंना माहीत आहे. गावातीलच श्याम चव्हाण नावाचा एक मुलगा आमच्या शाळेत शिपाई म्हणून नोकरीला आहे. एकेदिवशी श्याम माझ्याजवळ आला आणि म्हणाला, ''पाटील सर, मलगाव गावाजवळ गुऱ्हाळपाणी म्हणून छोटासा जो पाडा आहे. तेथे एका मुलाला नागपंचमीच्या दिवशी भला मोठा नाग दिसला. तो ओरडला तसा तो नाग एका वडाच्या झाडात शिरला.'' श्यामला ऐकीव माहिति मिळाली होती. त्यामुळे नंतर जेव्हा मी त्या जागेवर जावून पाहिले तर ते पळसाचे झाड होते. म्हणजे एखादी बातमी पुढे कशी चुकीच्या पद्धतीने पसरते हे त्याचे उदाहरण होते. तो पुढे म्हणाला, ''त्या नागाने झाडाच्या मुळातून नागाचा अवतार घेतला अशी माहिती त्या मुलाने गावात सांगताच त्या पाड्यावर व आजूबाजूचे गावातील लोक त्या ठिकाणी येऊ लागले. तो सापाच्या आकारासारखा दिसणारा मुळांचा भाग म्हणजे नागाचे रूप असे समजून पंचक्रोशीतील लोकं जमू लागले व मुळांचा आकार नागासारखा असल्यामुळे त्यावर लोकांचा विश्वास बसत होता. आजूबाजूच्या लोकांकडून नागाचा अवतार समजून पाया पडणे व पूजाअर्चा सुरू झालेली आहे. आपण मोठ्या सुट्टीत बघायला जाऊ सर'', असे मला त्याने सुचविले. व्हॉट्सअप युनिव्हर्सिटीद्वारे आलेले झाडाच्या मुळांचे फोटो त्याने मला दाखवले. ते बघून माझे सहकारी बी. डी. चौधरी सर व प्रवीण पावरा सर यांनी देखील त्या भागाला भेट देण्याची उत्सुकता दाखवली. त्या विषयावर गावात व आजूबाजूच्या गावात चर्चा कशी चाललेली आहे हे मला सांगितले. दुपारी आम्ही त्या जागेवर जाण्यासाठी निघालो. माझ्या मनात विचारचक्र सुरू झाले. आजच्या आधुनिक युगात एकीकडे आपण चंद्रावर यान पाठवून माहिती घेतो व दुसरीकडे ग्रामीण भागात असा प्रकार चालतो याचे फार वाईट वाटले.

मलगाव गावात आलो व तिथून गुऱ्हाळपाणी या पाड्याकडे निघालो. पाड्यापर्यंत गाडी जात नसल्यामुळे मी प्रमुख रस्त्यावरच गाडी उभी केली. येथून पायीच पाड्याकडे जायला निघालो. मध्येच एका शेतात एक मनुष्य कापूस कोळपण्याचे काम करीत होता. त्याला श्यामने विचारले, ''दादा, काल जे काही नाग दिसल्याचा प्रकार घडला ती जागा कुठे आहे?'' तेव्हा त्या माणसाने आम्हाला लांबूनच ती जागा दाखवली. आम्ही कापसाच्या

शेतातून मार्ग काढत कसेबसे त्या जागेजवळ पोहचलो तेव्हा एक छोटासा नाला ओलांडल्यावर पलीकडे एक पळसाचे झाड आम्हाला दिसले. त्या झाडाजवळ आम्ही पोहोचलो. ती जागा बघितल्यावर माझ्या लक्षात आले की, या जागेवर माणसं कामाशिवाय कधीच येत नसतील. पण त्या ठिकाणी एक मनुष्य उभा  होता. त्याला आदिवासी बोलीभाषेतच पावरा सरांनी विचारले, ''तू काय कामासाठी आलेला आहे?'' त्याने सांगितले की, ''मी या ठिकाणी या जागेची देखभाल करण्यासाठी थांबलेलो आहे.'' म्हणजेच त्या जागेला व्यवसायाचे स्वरूप येण्याची तयारी झालेली होती. आम्ही जवळ जाऊन त्या झाडाचे निरीक्षण केले. झाड चारही बाजूने बघितले तर कुठेही साप झाडाच्या आत जाईल अशा पद्धतीची जागा नव्हती. झाडदेखील भक्कम व भरीव होते. तीनही बाजूला गोल, रेखीव होते. एका बाजूला नवीन मुळे तयार होऊन बाहेर आल्यासारखी दिसत होती. त्या मुळांची पूजाअर्चा झालेली होती. काही नारळ फोडलेले होते. थोडे फार पैसे देखील ठेवलेले होते. मी स्वतःशीच हसलो व काय ते समजलो. पायातील बूट काढून झाडाजवळ जातच होतो तेव्हा माझे सहकारी चौधरी सर म्हणाले, ''जरा लांबूनच राहा.'' त्यांना देखील कदाचित वाटत असावं की, मध्ये नाग गेलेला असावा. मी त्यांच्या त्या वाक्यावर मनातल्या मनात हसलो. नागासारखा आकार असलेल्या मुळांना हात लावला. झाडाच्या मुळांना बोटाने थोडे दाबून पाहिल्यावर मऊपणा जाणवत होता. त्यावरून लक्षात आलं की, हा झाडाचा भाग नसून नवीनच काही तरी उगवलेलं आहे. निरखून पाहिले तेव्हा लक्षात आले की, तो नवीनच उगवलेला भाग असून तो झाडाला लागूनच बाहेर आलेला होता. त्याचक्षणी आमच्या जायंट्स ग्रुप ऑफ शहादाचे अध्यक्ष प्रा.एच.एम.पाटील (धडगाव येथे वरिष्ठ महाविद्यालयामध्ये बॉटनी या विषयाचे प्राध्यापक आहेत) यांना फोन करून त्या भागाचे फोटो पाठविले. तेव्हा सर म्हणाले की, ''झाडाच्या मुळांच्या आकाराचा असणारा हा भाग झायलेरिया (Xyalria) ही असकोमासेटिज प्रकारातली बुरशी आहे. तिचा सदर झाडाशी व सापाशी काही संबंध नाही. तसेच बुरशीतज्ज्ञ डॉ. के. एन. बोरसे (धुळे) यांच्या अवलोकनानुसार अशा प्रकारच्या शंभराच्यावर बुरशीचे प्रकार आहेत. आपण त्या झाडाच्या खाली खोदल्यास आपल्याला थोड्याच अंतरावर त्या जमिनीतून उगवलेला आणि त्या झाडाशी काही संबंध नसलेला तो भाग दिसेल'' असे सांगितले.

मग आम्ही त्या शेतमालकाकडे जाण्याचे ठरवले आणि गुऱ्हाळपाणी या पाड्यावर आलो. तेथे एका दुकानदाराला सहज विचारले की, ''ज्यांच्या शेतात नाग निघालेला होता त्यांचे घर कुठे आहे?'' तो म्हणाला, की ''मगन अजार्या वाघ असे त्याचे नाव आहे.'' आम्ही त्यांच्या शेतात काय घडले याची चौकशी त्या दुकानदाराकडे केली तेव्हा जी माहिती त्याने सांगितली ती माहिती शेतातल्या मुलाने सांगितल्यापेक्षा वेगळी होती. तो म्हणाला, की ''एका मुलाला त्या ठिकाणी बकऱ्या चारत असताना नाग दिसला व तो झाडामध्ये शिरला आणि त्याने मुळांचं रूप धारण केलं.'' ''तो मुलगा त्या शेतवाल्याचाच आहे का?'' असा प्रश्न केला तेव्हा तो म्हणाला, की ''नाही. तो मुलगा गावातील दुसरा होता.'' यावरून ऐकीव गोष्टी कशा वेगवेगळ्या असतात याचा प्रत्यय आला.

नंतर आम्ही शेतमालकाच्या घरी गेलो तेव्हा तो शेतमालक घरात झोपडीत बसलेला होता. त्याच्याजवळ गावातील दोन माणसे बसलेली होती. आम्हाला बघून त्याने नमस्कार केला व लंगडीचे शिक्षक असल्यामुळे आम्हाला तो ओळखत होता. मग आम्ही त्याला ''आपल्या शेतातल्या घडलेल्या घटनेबाबत आम्हाला माहिती हवी आहे'' असं  सांगितलं. तेव्हा तो म्हणाला, ''माझा मुलगा नागपंचमीच्या दिवशी शेतामध्ये बकऱ्या चारण्यासाठी गेलेला होता. त्यावेळेस त्याला झाडाच्या बाजूला शेतातून एक साप येताना दिसला. नंतर त्या सापाने जेव्हा मोठा फणा काढला तेव्हा मुलगा घाबरला आणि आरोळी मारली. तेव्हा तो साप झाडाकडे त्याला जाताना दिसला. नंतर तो घाबरून पळाला आणि शेताच्याजवळ काम करणारा एक माणूस धावत धावत त्याच्याकडे आला. तेव्हा त्या दोघांनी ज्या ठिकाणी साप दिसला होता त्या ठिकाणी बघितलं तर साप गायब झालेला होता. ज्या ठिकाणी साप जाताना दिसला त्याच ठिकाणी सापाने या पद्धतीचे रूप धारण केलं'' असं तो म्हणाला. मग मी त्याला प्रश्न केला, की ''ज्या मुलाने तो साप बघितला तो मुलगा कुठे आहे?'' तेव्हा तो म्हणाला,

की ''तो गावात गेलेला आहे.'' मी त्याला बोलवण्यासाठी सांगितले तेव्हा त्याला बोलावून आणण्यासाठी त्याने आपल्या मुलीला पाठवले. थोड्याच वेळात तो मुलगा आला. त्या मुलाचे वय साधारणतः १२-१३ वर्षे असावे. तो एका आश्रमशाळेमध्ये सहावीला शिकत होता. मी त्या मुलाला नाव विचारलं तेव्हा त्याने त्याचे नाव विष्णू सांगितले. मी म्हणालो, ''बेटा, कोणत्या दिवशी हा प्रकार घडला? कसा घडला? याबद्दल मला थोडी माहिती दे.'' तो मुलगा म्हणाला, ''मी नागपंचमीच्या दिवशी आमच्या शेतात कापसामध्ये जे गवत काढलेले होते त्या गवताचे छोटे छोटे ढीग उचलून बांधावर टाकत होतो. (या ठिकाणी मुलगा घडलेला प्रसंग सांगतोय तो वेगळे सांगत होता आणि शेतात त्या जागेचं रक्षण करणारा मुलगा वेगळे सांगत होता, गावातील दुकानदार वेगळे सांगत होता व त्याचे वडील वेगळे सांगत होते. अशी विसंगती मला जाणवली) मी एकटाच त्या ठिकाणी ते काम करत होतो. जेव्हा मी गवत एका टोपलीत भरून पळसाच्या झाडाजवळ फेकायला आलो तेव्हा सरसर असा आवाज आला. तो आवाज झाडाच्या एका बाजूने येत होता. मला थोडी भीती वाटली. मग मी ते बघायला गेलो तर भला मोठा साप त्या ठिकाणी दिसला. मी घाबरून आरोळी मारली तेव्हा तो झाडाजवळ जाताना मला दिसला. मग मी धावत सुटलो. मला जवळच्या शेतात काम करणाऱ्या एका माणसाने बघितले. तो माझ्याकडे धावत आला. त्याला मी या ठिकाणी मला भला मोठा साप दिसला असे सांगितले. तेव्हा आम्ही दोघं त्या झाडाजवळ आजूबाजूला बघितले तर त्या ठिकाणी साप नव्हता व झाडाचे एका बाजूला मला सापासारखा दिसणारा झाडाचाच मुळांसारखा भाग दिसला आणि सापाने मुळांचे रूप घेतले होते.'' मग मी त्या मुलाला विचारले, की ''त्या झाडाला आधी मुळांसारखा दिसणारा भाग वर आलेला होता का?'' तर तो म्हणाला, की ''नाही.'' मी म्हटलं, ''आधी तू ते झाड चारी बाजूंनी बघितलं होतं का?'' तर तो म्हणाला, ''नाही. मी जेव्हा त्या झाडाच्या जवळचे आणि शेतातील झाडाच्या आजूबाजूचे गवत उचलले तेव्हा जवळच झाडाच्या बांधाजवळ गवत टाकण्यासाठी मी पहिल्यांदा गेलो तर मला साप दिसला, म्हणून मी झाड आधी संपूर्ण बघितलं नव्हतं.'' मग मी त्याच्या वडिलांना विचारले, की ''तुम्हाला शेतात गेल्यावर आधी अशा मुळ्या दिसल्या होत्या का?'' तर ते म्हणाले, की ''नाही. या आधी मी पंधरा दिवसांपूर्वी शेतात गेलो होतो; पण मला दिसल्या नाहीत. शेताच्याकडे जो झाडाचा भाग आहे त्या दिशेला मुळ्या आहेत त्यामुळे तो भाग लगेच दिसतो'' असं तो म्हणाला. ''याआधी त्या ठिकाणी मुळ्या कधीच आलेल्या नव्हत्या. तो साप आत गेला आणि त्याने रूप घेतले'' असे मगन वाघ सांगू लागले. मी म्हणालो, की ''साप दिसल्यावर तो घाबरून पळाला. त्यामुळे तो झाडात जाताना याने प्रत्यक्ष बघितला नाही. तसेच झाड सर्व बाजूने भक्कम व भरीव आहे, त्यामध्ये साप जाऊ शकेल अशी जागा नाही.'' मग मी त्यांना समजावून सांगितले, की ''मी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे काम करतो. सापाला, माणसाला, प्राण्याला असं रूप घेता येत नाही. आम्ही आत्ताच तुमच्या शेतात जाऊन आलो तर त्या ठिकाणी मला असे दिसले की, त्या पळसाच्या झाडांच्या मुळ्या नाहीत. कारण झाडांच्या मुळ्या सदर झाडांच्या मुळ्या जशा असतात तशाच दिसतात. तसेच झाडाच्या खोडाला लागून वर आलेल्या आणि त्या झाडाच्या इतर मुळ्यांसारख्याच त्या असतात. परंतु या पळसाच्या झाडांच्या मुळ्या नसून, तो बुरशीचा एका प्रकाराचा थोडासा भाग आहे. अशी बुरशी आपण पावसाळ्यामध्ये उकिरड्यावर कुत्र्याची छत्री उगवलेली पाहातो, तसाच हा मुळांजवळील भाग उगवलेला आहे. हा बुरशीचा एक प्रकार असून, तो झाडाच्या शेजारीच उगवलेला असून तो नुकताच बाहेर आलेला आहे. म्हणून तुम्ही पंधरा दिवसांपूर्वी जेव्हा शेतात गेला होतां तेव्हादेखील तो नव्हता. मात्र काही दिवसांपूर्वीच तो उगवून वर आलेला आहे. त्यामुळे तो कुठल्याही प्रकारचा नागाचा अवतार नसून तो बुरशीचा एक प्रकार आहे'', असे मी त्यांना समजून सांगितलं. त्यावर त्यांनी त्यांच्या पद्धतीने ते नागाचा अवतारच आहे असं मला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. पण मी त्यांना जेव्हा ''अशा प्रकारचा कुणालाही कुणाचा अवतार घेता येत नाही. साप जेव्हा मुलाला दिसला तो जर त्याने शेवटपर्यंत बघितला असता तर त्याला तो साप कुठेतरी जाताना दिसला असता. परंतु

तो घाबरून पळून गेल्यामुळे तो साप इतरत्र जाण्याची शक्यता आहे किंवा जमिनीतल्या भेगेत त्याला जिथे जागा मिळेल तिथे तो गेला असावा. म्हणून त्या झाडात व झाडाच्यामध्ये साप गेला नाही. त्याने अवतार घेतला नाही. जी पूजाअर्चा चालू आहे ती सगळी अंधश्रद्धा पसरवणारी आहे. म्हणून कृपया आपण असं काही करू नये. तुम्हाला जर याची शहानिशा करायची असेल तर आपण झाडाच्या एका बाजूला जर खोदकाम केलं तर तुम्हाला त्या ठिकाणी निश्चितपणे काही अंतरावर या बुरशी उगवलेल्या दिसतील'', असे मी त्यांना सांगितलं. तेव्हा त्यांना ते थोडं पटत होतं. परंतु काही लोकांचे याच्यामध्ये हित जोपासलं जातं म्हणून त्या गोष्टीला सहसा तयार होत नाहीत. मी त्यांना म्हटलं, की ''आपण या पद्धतीने थोडं खोदकाम केलं तर चालेल का?'' तेव्हा मगन वाघ म्हणाले, की ''नाही. जर खरंच नागदेवता असेल तर आमच्यावर नाराज होईल व वाईट होईल.'' असं ते आपल्या बोलीभाषेमध्ये सांगत होते. शेवटी मी त्यांना सांगितलं, की ''बाबांनो, अशा पद्धतीचा कुठलाही प्राणी, साप, मनुष्य असा अवतार घेऊ शकत नाही. हे तुम्ही लक्षात घ्या.'' तेव्हा त्यांनी शेवटी, आम्ही याच्यानंतर त्या ठिकाणी कुठल्याही प्रकारची पूजाअर्चा किंवा मंदिर असं काही बांधकाम करणार नाहीव असा आम्हाला शब्द दिला आणि आम्ही मग शाळेत आलो. पुढील पंधरा दिवसांपर्यंत मी रोज त्या ठिकाणी काही घडतं का? असं मी माझ्या विद्यार्थ्यांना विचारत होतो. परंतु त्या ठिकाणी पूजाअर्चा असं काही घडत नाही, असं मला माझे विद्यार्थी म्हणाले. अजूनही या जगात आपल्या सोयीसाठी श्रद्धेच्या नावाखाली अंधश्रद्धेचा बाजार भरविला जातो. खरंच, आपण विज्ञानयुगात जगत आहोत का? असा प्रश्न पडतो.

●

---

**(पृष्ठ क्रमांक ५ वरून )**

संस्कार अगदी बालपणापासूनच होणे आवश्यक आहे. याबाबतीत आजचं सरकार निष्क्रिय आहे, याचा फारसा बाऊ न करता, कायदेभंग न करता आपल्याला काय करता येईल, याचा विचार करावा लागेल. सत्याग्रह, उपोषण आदी मार्गांना अलीकडे तरुणांचा फारसा प्रतिसाद मिळत नाही.

आज विज्ञान-तंत्रज्ञानाच्या जबरदस्त झपाट्यामुळे परिस्थिती दिवसेंदिवस बदलते आहे. तिच्याच आधारे आपण नावीन्याचा शोध घेत नव्या विचारांची बीजे रुजवायची आहेत. त्यासाठी आपल्यात थोडीशी ऋजुता असली पाहिजे आणि समाजात आपल्याला अगदी तळागाळातील शेवटच्या माणसापर्यंत जाता आले पाहिजे. त्यादृष्टीने आपल्या संघटनेची वाटचाल चांगली चाललेली आहे, त्याच्याबद्दल मी सदिच्छा व्यक्त करतो. आपण सर्वांनी मिळून महात्मा फुल्यांची प्रार्थना म्हणूया–

'सत्य सर्वांचे आदी घर।। सर्व धर्मांचे माहेर।।
जगांमाजी सुख सारे।। खास सत्याची ती पोरे।।
सत्य सुखाला आधार।। बाकी सर्व अंधकार ।।
आहे सत्याचा बा जोर।। काढी भंडाचा तो नीर।।
सत्य आहे ज्याचे मूळ।। करी धूर्तांची बा राळ।।
बळ सत्याचे पाहुनी।। बहुरूपी जळे मनी।।
खरे सुख नटा नोव्हे।। सत्य ईशा वर्जू पाहे।।
जोती प्रार्थी सर्व लोकां।। व्यर्थ डंभा पेटू नका।।'

शब्दांकन - राजेंद्र फेगडे

●

---

## जटा निर्मूलन

**इस्लामपूर :** शाखेच्यावतीने श्रीमती रंजना उत्तम मोरे (वय ४५ वर्ष, देववाडी, ता. वाळवा) या महिलेचे जटा निर्मूलन राज्य प्रधानसचिव संजय बनसोडे, डॉ.जितेंद्र लादे, डॉ.दिपाली लादे, जायंट्स ग्रुपचे अध्यक्ष नितीन फल्ले, डॉ.नितीन शिंदे, निमिष लादे, अरबाज पटेल यांनी केले.



# नरिंदर सिंह कपानीः फायबर ऑप्टिक्सचे जनक



**डॉ. नितीन हांडे,** पुणे
८९५६४४५३५७

आज संपूर्ण जग आणि त्यातील लोक, त्यांचा व्यापार इंटरनेटच्या माध्यमातून एकमेकांशी जोडलेला आहे. लोकांचे शिक्षण, मनोरंजन, एवढंच काय, रोजचं जगणं देखील इंटरनेटवर अवलंबून आहे. गॅस बुकिंग असो अथवा विद्युतबिल भरणा, प्रवासाचे नियोजन असो अथवा वस्तूंची खरेदी, सर्वकाही घरबसल्या होते. एकेकाळी या बाबींसाठी लाईन लावावी लागत होती, प्रचंड वेळ जात होता असं पुढच्या पिढीला सांगितलं, तर त्यांना कदाचित खरंदेखील वाटणार नाही. इंटरनेटमुळे आपल्या या अनुत्पादक दैनंदिन कामांमध्ये बदल झाला, या कामासाठी पूर्वी लागणाऱ्या वेळेत प्रचंड बचत झाली. आता हा वेळ अधिक सर्जनशील कामासाठी वापरता येऊ शकतो. बहुतांश लोक सर्जनशील कामासाठी हा वेळ वापरत नाही हा भाग वेगळा!

एकविसावं शतक हे वेगाचं शतक आहे असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. एकेकाळी डायलअप कनेक्शनने ६४ किलो बाईट प्रतिसेकंदपेक्षा कमी इंटरनेटच्या वेगावर भागवायला लागायचं. आता हा इंटरनेटचा वेग सामान्य ग्राहकालादेखील ३०० मेगा बाईट प्रतिसेकंदपर्यंत उपलब्ध आहे. अमेरिकेतील ग्राहकांना तर इंटरनेटचा वेग गिगा बाईट प्रतिसेकंदमध्ये मिळू शकतो. ही किमया साधली आहे फायबर ऑप्टिक्स या तंत्रज्ञानाने आणि जगाला या तंत्रज्ञानाची देणगी दिलेला शास्त्रज्ञ भारतीय आहे, नरिंदर सिंह कपानी. त्यांनी शोधलेलं फायबर ऑप्टिक तंत्रज्ञान केवळ इंटरनेटच नाही, तर मेडिकल क्षेत्रामध्ये देखील अतिशय मोलाचं ठरलेलं आहे. याशिवाय सौर ऊर्जा, प्रदूषण नियंत्रण यांसारख्या विषयात त्यांचं काम मोलाचं आहे. त्यांच्या नावावर एकूण १२० पेटंट आहेत. ४ पुस्तकं आणि १०० संशोधन पेपर लिहिणारा, भारताचा दुसरा सर्वोच्च पुरस्कार पद्मविभूषण मिळालेला हा शास्त्रज्ञ फारसा कुणाला माहीत नाही.

पंजाबमधील मोगा या तालुक्याच्या शहरात (आता तो स्वतंत्र जिल्हा झाला आहे.) एका सधन शीख कुटुंबात ३१ ऑक्टोबर, १९२६ रोजी नरिंदर जन्माला आला. लहान असताना जन्मदिवसानिमित्त वडिलांनी कोडॅकचा कॅमेरा भेट म्हणून दिला. त्या काळात अतिशय महागडा आणि केवळ श्रीमंतांनाच परवडेल असा हा कॅमेरा. मात्र



आपल्या या बाळाला त्याच्या सर्व प्रश्नांचं उत्तर हवं असतं, मग काय.. तो नवा, कोरा कॅमेरा नक्की कसं काम करतो, त्यात प्रकाशाची भूमिका नक्की काय असते हे पाहाण्यासाठी छोट्या नरिंदरने कॅमेरा खोलून पाहिला आणि बिघडवला. हिमालयातील शिखरे न्याहाळत असताना त्याच्या लक्षात आलं की, सूर्य जर या शिखरांच्यामागे आहे तर मग प्रकाश पोहचतो कसा? शाळेत गुरुजी सांगतात, प्रकाश एका सरळ रेषेमध्ये प्रवास करतो, मग असं होतं कसं?

नरिंदरने या प्रकाशाच्या प्रश्नाचा ध्यास घेतला होता. पुढे पीएच.डी.साठीदेखील हाच विषय निवडला. १९५५ साली कपानी यांना ती प्रदान झाली. त्याचवर्षी

फेब्रुवारीमध्ये "Optica Acta' या मासिकात त्यांनी 'Transparent Fibres for the Transmission of Optical Images' या नावाने संशोधन पेपर प्रकाशित केला, ज्याला विज्ञान जगतात खूपच प्रसिद्धी मिळाली. या काळात त्यांना पंडित नेहरू भारतात बोलवत होते. संरक्षणमंत्री मेनन आणि स्वतः नेहरूंसोबत त्यांची भेट झाली. संरक्षणमंत्र्यांचे वैज्ञानिक सल्लागार म्हणून त्यांना नोकरी देऊ केली गेली. कपानी यांनी नोकरी स्वीकारलीदेखील असती, मात्र सरकारी बाबू लोकांकडून लवकर सूत्रे हलली नाहीत. शेवटी जेव्हा नियुक्तीपत्र तयार झालं, तोवर कपानी यांचा त्या नोकरीतील रस संपला होता. त्यांनी अमेरिकेतच स्थायिक व्हायचे आणि फायबर ऑप्टिक्समध्येच भविष्य घडवायचं ठरवलं.

फायबर ऑप्टिक म्हणजे माहितीचे वहन एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी करणारे तंत्रज्ञान. माहितीचे वहन दोन प्रकारे होते. वायरच्या साहाय्याने आणि वायरलेस तंत्रज्ञान वापरून. पैकी ट्विस्टेड पेअर तारेच्या साहाय्याने सुरुवातीला दूरध्वनी सुरू झाले, टी.व्ही. अँटेनासाठीदेखील अशीच साधी वायर होती. कालांतराने आपण केबल टी.व्ही.साठी वापरतो ती कोक्सिल तार वापरली जाऊ लागली, जिची प्रसारण क्षमता ट्विस्टेड पेअरपेक्षा ८० पट अधिक होती. दूरध्वनीसाठी फायबर ऑप्टिक्स वापरले जाऊ लागले, ज्याचा वेग स्टेट ट्विस्टेड पेअरपेक्षा २६००० पट अधिक होता. वेग तर होताच; शिवाय या केबलवर इलेक्ट्रोमॅग्नेटिक दुष्परिणाम होत नव्हता. पाण्यातदेखील या केबलला काही फरक पडत नव्हता. टेलिकॉम क्षेत्रामध्ये झपाट्याने बदल होत गेले आणि फायबर ऑप्टिक्सने पारंपरिक वायरला बाहेर फेकून दिलं.

हे तंत्रज्ञान नक्की काम कसं करतं? एका फायबर ऑप्टिकल केबलमध्ये काचेचे अनेक तंतू असतात. प्रकाशकण किंवा फोटॉनच्या स्वरूपात माहिती प्रसारित केली जाते. तीदेखील प्रकाशाच्या वेगाच्या ७० टक्के इतक्या प्रचंड गतीने. एका ठिकाणी उपकरणांच्या मदतीने माहितीचं कोडींग होऊन फोटॉनमध्ये रूपांतर होतं. येणारा प्रकाश एका विशिष्ट कोनातून वाकवला जात. माहिती पाठवली जाते. दुसऱ्या ठिकाणी फोटॉनरूपी माहितीचे डिकोडिंग होतं. अशी साधी, सोपी वाटणारी यंत्रणा. मात्र एवढं सोपं नसतं. हा फोटॉन खूप आळशी असतो. या फोटॉनला पुन्हा पुन्हा पुढं ढकलायला लागतं, त्यासाठी पुनरावृत्ती यंत्र वापरली जातात. प्रकाशरूपी माहितीचे रूपांतर विद्युतरूपात केलं जातं, त्याचं पुन्हा आवश्यक त्या ठिकाणी प्रकाशरूपात रूपांतर केलं जातं. तुमच्या वायफायसाठी किंवा तुमच्या मोबाईलसाठी देखील कुठंतरी वायर्ड कनेक्शन वापरले गेलेले असतेच. फायबर ऑप्टिकचा उपयोग केवळ इंटरनेटसाठी नाही बरं. विविध वैद्यकीय उपकरणांमध्ये फायबर ऑप्टिक्सचा वापर वारंवार केला जातो. इलेक्ट्रोमॅग्नेटिक परिणाम होत नसल्यामुळे एमआरआय स्कॅनसारख्या विविध चाचण्यांसाठी फायबर ऑप्टिक्स उपयुक्त आहे. एक्स-रे इमेजिंग, एंडोस्कोपी, लाइट थेरपी आणि सर्जिकल मायक्रोस्कोपी यासारख्या अनेक तपासण्या आणि शस्त्रक्रिया फायबर ऑप्टिक्समुळे सुलभ आणि अचूक झाल्या आहेत.

संशोधनासोबतच त्याचं उपयोजन करण्यामध्ये आवश्यक असलेली कल्पकता कपानी यांच्याकडे होती. सौरघटांची क्षमता वाढवताना, खिडकीवर तसेच भिंतीवर वापरल्या जाऊ शकतील अशा सौरपटलांची त्यांनी निर्मिती केली, ज्यामुळे सूर्याची उष्णता शोषली जाऊन आतील वातावरण थंड राहाते म्हणजेच नवीन विजेची निर्मिती होत असतानाच आतील कार्यालयात पंखे किंवा वातानुकूलनसाठी वीज लागत नव्हती. १९६० साली जेव्हा लेसरचा शोध लागला, तेव्हा त्याचा वापर करून डोळ्यातील फाटलेला रेटिना जोडण्याची शिफारस सर्वप्रथम कपानी यांनी केली होती. कोविडच्या काळामध्ये ऑक्सिजन पातळी तपासण्याचे प्रमाण खूप वाढले, त्यावेळेस आपल्यापैकी अनेकांनी ऑक्सिमीटर यंत्र पहिल्यांदा पाहिलं असेल. त्यामध्ये एक लाल लाईट असते, जी आपल्या बोटातील रक्तामधील ऑक्सिजनची पातळी सांगते. त्या यंत्राचं आजचं रूप घडविण्यात कपानी यांचे मोलाचं योगदान आहे.

कपानी यांनी ऑप्टोइलेक्ट्रॉनिक्स या विषयावर जवळपास १०० रिसर्च पेपर्स आणि ४ पुस्तकं लिहिली आहेत. याशिवाय राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सायंटिफिक सोसायटीमध्ये अनेक व्याख्याने दिली आहेत. त्यांच्या कामाची दखल घेऊन अमेरिकेतील (MIT) संस्थेने त्यांना फायबर ऑप्टिक्सचे जनक असं संबोधलं होतं. अनेक

अमेरिकी राष्ट्राध्यक्षांनी कपानी यांचा वेळोवेळी सल्ला घेतल्याचा आढळतो. कपानी यांची जीवनज्योत वयाच्या ९४ व्या वर्षी रेडवूड सिटी, कॅलिफोर्निया येथे ४ डिसेंबर २०२० रोजी मावळली. तत्पूर्वी मार्च २०२० मध्ये त्यांनी आपले आत्मचरित्र पूर्ण केलं होतं. त्यांना भारत सरकारने मरणोपरांत पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित केलं आहे. कपानी यांनी लावलेला फायबर ऑप्टिक्सचा शोध विज्ञानाच्या क्षेत्रात विजेच्या शोधाएवढा महत्त्वाचा नक्की असेल. खरं तर, माहितीचा प्रचंड साठा आज आपल्याला फायबर ऑप्टिक्सच्या अतिवेगवान तंत्रज्ञानामुळे अगदी चुटकीसरशी उपलब्ध होत आहे. या सुविधेचा अधिक सर्जनशीलतेने वापर केला, तर प्रत्येकाला आपल्याला आवडत्या विषयातील सर्वोत्तम माहिती वापरून स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास घडवता येईल. आपले सांस्कृतिक भावविश्व अधिक समृद्ध करता येईल. पुढच्या पिढीला अधिक चांगला मानव म्हणून घडवता येईल. अजूनही आंतरराष्ट्रीय स्तरावर काम केलेले भारतीय शास्त्रज्ञ हाताच्या बोटावर मोजता येतील एवढेच आहेत. त्यात वाढ करता येईल. अजून बऱ्याच काही चांगल्या बाबी शक्य आहेत. बस गरज आहे, स्वतःचा मेंदू वापरणाऱ्या पिढीची आणि तंत्रज्ञान साक्षरतेची.

●

---

**(पृष्ठ क्रमांक ८ वरून )**

आज आपण धर्मनिरपेक्षतेविरुद्ध असलेल्या, धर्माच्या नावावरच्या राजकारणाचा मुकाबला केला पाहिजे. खूप कठीण आहे. तर काय केले पाहिजे? एक तर आपल्याला 'इंडिया', भारताला वाचवायचे आहे. आजही धर्मनिरपेक्षतेला मानणाऱ्या, तार्किकतेला मानणाऱ्या, सामाजिक आंदोलनांना मानणाऱ्या, समाजाचे भले चिंतणाऱ्या, चांगला समाज बनवणाऱ्या लोकांची संख्या अधिक आहे. परंतु, आपण विखुरलेले आहोत. आता एकमेकांबरोबर खांद्याला खांदा लावून चालण्याची, हातात हात घालून चालण्याची गरज आहे. सामाजिक आंदोलनांनी आपल्याला जी भूमिका पार पडणे आवश्यक आहे ती भूमिका पार पाडली पाहिजे. आपले जे विचार आहेत त्या आधारावर आपण एकत्र आंदोलन करूया आणि आंदोलनच आहे जे लोकशाहीला जिवंत ठेवते. लोकशाहीशिवाय आंदोलन जिवंत राहू शकत नाही आणि आंदोलनाशिवाय लोकशाही मजबूत होऊ शकत नाही. समाजातील तळागाळाच्या लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न केला पाहिजे. एकीकडे आंदोलन आणि दुसरीकडे सामाजिक चेतना जागृत करणे. नौजवानांशी दोस्ती करून त्यांना आपल्यासोबत आणावे. डावे असोत, समाजवादी असोत, अंधश्रद्धा निर्मूलनवाले असोत, प्रत्येक ठिकाणी जाऊन महिन्यातून एकवेळ, पंधरवड्यातून एकवेळ, प्रबोधनाचा कार्यक्रम करणे आवश्यक आहे. छोट्या छोट्या कार्यकर्त्यांनीदेखील आपल्या मोहल्ल्यात, आपल्या वस्तीत, कार्यालयात पंधरा-वीस दिवसांतून एखादा कार्यक्रम का करू नये?

'हिंदू राजा, मुसलमान राजा याने काय फरक पडतो', हे गांधीजींचे वाक्य आहे. त्यालाच पुढे घेऊन जाऊन जवाहरलाल नेहरू म्हणाले होते, 'हिंदू-मुसलमान यांच्यातील समन्वयातूनच सभ्यता, संस्कृती, साहित्य, कला, धार्मिक परंपरा यांचा विकास झाला.' जाताजाता धार्मिक परंपरा आणि खाणे-पिणे यावर बोलतो. धार्मिक परंपरेत आपल्याकडे वारकऱ्यांमध्ये हिंदू तर आहेतच, त्यात मुसलमान, शेख मोहम्मदचे अनुयायी मोठ्या संख्येने आले. संत कबीर, ख्वाजा गरीब नवाज यांना मानणारे हिंदू आणि मुसलमान आहेत. ही आपल्या समन्वयाची आणि मिळून-मिसळून राहण्याची बाब आहे. सगळ्यात मोठी समन्वयाची बाब, आपल्या खाण्या-पिण्यातील. आपण वाढदिवस साजरा करतो, तेव्हा केक कापतो. कधी बिर्याणीचा आस्वाद घेतो. कोणी म्हणेल हे खाऊ नका, तर त्याचे म्हणणे ऐकू नका. जे चांगले वाटते ते करा. मिळून-मिसळून राहिल्याशिवाय मानव समाजाचा विकास होऊ शकत नाही. ही बाब आपण आपल्या कम्युनिटी सेंटर्समध्ये, फिल्मच्या माध्यमातून ठसवली पाहिजे. हे काम सामाजिक चेतनेपर्यंत घेऊन जाणे गरजेचे आहे. डॉ. दाभोलकर यांना पूर्ण श्रद्धांजली देत त्यांच्या कामाला आपण जिवंत ठेवायचे आहे, वाढवायचे आहे. त्याबरोबरच यास धर्मनिरपेक्षतेच्या सामाजिक आंदोलनाशी जोडायचे आहे. हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. धन्यवाद!

शब्दांकन आणि अनुवाद : उत्तम जोगदंड

●



# कार्यकर्त्याने कुंपणावर बसू नये

**भाऊसाहेब पठाडे**, औरंगाबाद
८१०८३७६८४३

दि.२१ ऑगस्ट २०१३ चे वृत्तपत्र हाती पडले. डॉ. नरेंद्र दाभोलकरांचा आदल्या दिवशीच, २० ऑगस्टला खून झाला होता. काळजाचा ठाव घेणाऱ्या या बातमीने गलबलून आले. मी काही त्यांच्या संघटनेचा रीतसर कार्यकर्ताही किंवा सभासद देखील नव्हतो. परंतु माझ्यातील एकांड्या शिलेदार अंधश्रद्धा निर्मूलन कार्यकर्त्याला, समाजसेवकाला दाभोलकर कोण होते आणि त्यांचे कार्य काय आहे ते चांगले माहिती होते. त्यांच्यात आणि माझ्यात एक अनामिक, अदृश्य मानसिक दुवा होता, तो या बातमीने तुटून माझ्या आतील त्या एकांड्या अंधश्रद्धा निर्मूलन कार्यकर्त्याला खोल गर्तेत फेकला गेल्यासारखा जबर झटका त्या क्षणी बसला. त्यांच्या मागे पत्नी व दोन मुले आहेत असेही बातमीत वाचले. माझी ही अशी अवस्था तर त्यांच्या कुटुंबियांवर केवढी मोठी दुःखाची कुऱ्हाड कोसळली असावी या कल्पनेने अधिकच व्यथित झालो. त्यांचे सांत्वन करण्यासाठी त्वरित साताऱ्याला जावे अशी तळमळ जाणवू लागली. इतके दिवस आपण कुंपणावर बसून होतो, थेट त्यांच्या चळवळीत काम केले नाही; याबद्दल स्वतःला दोष दिला. परंतु आता कुंपणावर न बसता डॉ दाभोलकरांनी चालवलेल्या चळवळीत प्रत्यक्ष काम करावे हे मनोमनी ठरवले.

मी ज्या परिस्थितीतून आलो तिने माझ्यातील अंधश्रद्धा निर्मूलन कार्यकर्त्याला एकांडा शिलेदार बनवले होते. गावातील ब्राह्मणाच्या मुलाचे नाव बाबासाहेब होते म्हणून आजोळच्यांनी जन्मताच ठेवलेले बाबासाहेब नाव मला धारण करता आले नाही; ते भाऊसाहेब असे करण्यात आले. कुटुंबाचा वारसा मिळाला तो अठरा विश्वे दारिद्र्याचा नि अशिक्षितपणाचा. चौथीपर्यंतच असलेल्या गावातील शाळेत आईने दाखल केले; जन्मतारीख सरकारी नियमानुसार ६ वर्षे पूर्ण व्हावी यासाठी गुरुजींनी अंदाजे ८ मे १९५९ नोंदवली. चौथी पास झालेला सरपंचाचा मुलगा पुढच्या वर्गात जाईल तसे शाळेचे वर्ग सातवीपर्यंत विस्तारले. म्हणून सातवीपर्यंत गावातच माझे शिक्षण झाले. गावातील भजनी मंडळात, पारायण सप्ताहात, दिंडीत, धार्मिक कार्यात, माझी नियमित उपस्थिती असे. लग्नसराईत, गणेशोत्सवात अग्रेसर, त्यामुळे गावकऱ्यांचाही लाडका. कसेबसे ५० टक्के मार्क मिळवून नेहमीच पहिला नंबर घेणारा म्हणून मी वासरातल्या लंगड्या गायीइतकाच हुश्शार. परंतु या हुशारीमुळेच गावातीलच सेवा सोसायटीच्या सेक्रेटरी पदावरील बुवा दाम्पत्याकडेच मला राहायला मिळाले. शिकलास, अभ्यास केलास तर मास्तर होशील. आता जसे काटे पायात टोचतात, तसे टोचणार नाहीत, असे सुमनबाई बुवा या माझ्या पालक मातेने मनावर बिंबवले आणि सातवी पास झालो.



त्याच वर्षी १९७२ चा भयंकर दुष्काळ आ वासून उभा राहिला. शिक्षण थांबेल अशी शक्यता असतांनाच गेवराई कुबेरचे सरपंच आले आणि म्हणाले आमच्या गावच्या शाळेत प्रवेश घेतल्यास खानपान-राहणे मोफत होईल. त्या शाळेत प्रवेश घेतला खरा पण दुष्काळामुळे गावकऱ्यांना त्यांचा शब्द पाळता येणार नव्हताच. गावकऱ्यांबरोबर आम्ही विद्यार्थी खडी फोडायला, तळ्यावर काम करायला जाऊ लागलो. दिवसा काम आणि रात्री कंदिलाच्या उजेडात रात्रशाळा भरायची. परीक्षेचा 'फार्स' करून आम्ही सर्व विद्यार्थी आठवीत काहीही न

शिकता पास होऊन नववीत गेलो. आठवी आणि नववीत असतांना दिवाळी आणि उन्हाळ्याच्या सुट्ट्यांत हॉटेलमध्ये काम करणे, सिडकोच्या घर बांधणी योजनेमध्ये घरांवर कौले बसवणे, पेंटिंग करणे इत्यादी कामे करायचो. पुढे औरंगाबादला अनाथ विद्यार्थी गृहात राहून मॅट्रिक पास झालो.

तोपर्यंत वाढत्या वयात पाहिले ते अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार, आचरणातील दांभिकता. अशा लोकव्यवहाराने आणि दारिद्र्याने पिचून गेलेल्या अंधकारमय वातावरणात मनाने ठरवले की, नंतरच्या जीवनात समाजातील भ्रष्टाचाऱ्यांना लुटावे, तेच गरिबांना वाटावे, हाच जीवनमार्ग. कारण मी आस्तिक आहे परंतु या अनीतिमान, अनाचारी लोकांना ईश्वर कुठे काय शिक्षा करतो?

परंतु देव न मानणाऱ्या डॉक्टर घारपुरे दाम्पत्याकडे कॉलेज शिक्षणासाठी घरकाम करून राहायला मिळाले. माझ्या पुढील शिक्षणासाठी त्यांनी माझं पालकत्व घेतलं. माझं मात्र दररोज न चुकता मुखोद्गत वेंकटेश स्तोत्राचे पठण असायचे. वर्षभर निरीक्षण केले, देव न मानणाऱ्या या माणसांचे आचरण माझ्या कल्पनेतल्या देवांहूनही श्रेष्ठ होते. घारपुरे दाम्पत्याकडे येणारी मंडळीही 'बोले तैसा चाले' या वृत्तीची. पण समाजात दुसरीकडे पहावे तर 'मुख मे राम बगल मे छुरी'. अन्याय, अत्याचार, चोऱ्यामाऱ्या, अतीव दारिद्र्य. न्यायमंदिरातील न्यायदेवतेला लाच घेतांना डोळ्यांनी पाहिले. जातीव्यवस्था नि त्यातील उच्चनीचता, पूर्वजन्म, पाप, पुण्य, प्रारब्ध, पापपुण्याची फळे यांचा संबंध काय? या सर्व बाबींची वासलात कशी लावायची? पुढे नोकरीतही हेच पाहिले, अनुभवले. खूप वैचारिक गोंधळ व्हायला लागला. देव नाही हा विचार दिवसेंदिवस बळकट होत गेला नि शेवटी देवावरील उडालेल्या विश्वासावर शिक्कामोर्तब झाले.

डॉक्टर घारपुरे दाम्पत्याकडे राहत असतांनाच ११ वी, १२ वी पास झालो. सुटीच्या दिवशी या कुटुंबाकडे कोणीतरी मित्र, पैपाहुणे जेवायला असायचेच. ११ वी प्रथम श्रेणीत पास झालो. तेव्हा दुसऱ्याच दिवशी जेवायला आलेल्या पाहुण्यांना पेढे दिले. पाहुण्यांनी कसले पेढे म्हणून विचारले तेव्हा त्यांना सांगण्यात आले की, आमचा भाऊसाहेब फर्स्टक्लासमध्ये पास झाला. मी पास झाल्याचा आनंद घारपुरे कुटुंबियांनाच अधिक झाला होता. त्यापुढील वर्षी १२ वीच्या आधारावरच बँकेची परीक्षा दिली. त्या निवडप्रक्रियेत पुन्हा एक वर्ष गेले आणि बँकेतील नियुक्तीचा आदेश हाती आला. तत्काळ नोकरीवर रुजू झालो. आता मी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झालो होतो. माझ्यासारख्या दारिद्र्याने, अज्ञानाने पिचलेल्या लोकांसाठी काहीतरी करावे असे जे मनात ठरवले होते ते करण्याची संधी आणि कुवत आता प्राप्त झाली होती.

प्रथम नियुक्ती सिल्लोडला होती. १९८५ मध्ये औरंगाबादला आलो. ज्यांच्यामुळे माझ्या व्यक्तिमत्त्वात बदल झाला त्या घारपुरे कुटुंबियांच्याच बंगल्याच्या आवारात राहू लागलो. त्या काळात अनेक सामाजिक कार्यकर्ते संपर्कात येऊ लागले. गरिबी आणि अज्ञान हे माणसाचे दोन मोठे शत्रू हे लक्षात आलेच होते. अज्ञानानेच अंधश्रद्धा वाढतात, त्या माणसाला पशुत्वाकडे नेतात, जीवनाचा दर्जाच खालावतो. म्हणून १९८८ मध्ये त्यावेळी श्याम मानव यांच्या काही सहकाऱ्यांसोबत अंधश्रद्धा निर्मूलनाचे काम करू लागलो. आडगाव (सरक) या माझ्या गावी काम सुरू केले. लिंबू मिरच्या यांच्या उताऱ्याच्या गावकऱ्यांच्या समोरच होळ्या करून त्यात ते टाकायचो. काही तरुण सोबत असत; परंतु बरेच विरोधातच असत. लहान मुलांसाठी स्वखर्चाने अनेक वर्षे गावात बालवाडी चालवली. सहकार आणि सरकारी योजनांचा लाभ मिळवून देत गावातील अनेक व्यावसायिकांना आणि शेतकऱ्यांना उत्पन्न वाढविण्यासाठी अनेक वर्षे मार्गदर्शन करीत राहिलो. दरम्यान अनेक बदल्या झाल्या. तरीही माझे गाव अडगाव (सरक) आणि त्यालगतच्या गावांमधील शेतकऱ्यांना उत्पन्न वाढीसाठी, अनेकांना त्यांच्या लहानमोठ्या समस्या सोडवण्यासाठी आणि त्यांचे अज्ञान, अंधश्रद्धा दूर करण्यासाठी चमत्कार सादरीकरण, त्यातून प्रबोधन असे एकांड्या शिलेदारांसारखे व्यक्तिगत स्तरावर काम करीत राहिलो. परंतु कोणत्या संघटनेशी जोडून घेता आले नाही. मात्र डॉ. नरेंद्र दाभोलकर ही व्यक्ती आणि त्यांनी चालविलेल्या अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीची माहिती मिळत होती.

शेवटी नवी मुंबई येथे बदली असतांना २१ ऑगस्ट २०१३ ला हाती आलेल्या वर्तमानपत्रात ती अस्वस्थ करणारी बातमी वाचली. आता मात्र कुंपणावर न बसता प्रत्यक्ष चळवळीत काम करावे हे मनोमनी ठरवले. नेरे, पनवेल येथे अंधश्रद्धा निर्मूलन कार्यकर्त्यांसाठी राज्यस्तरीय शिबिर असल्याचे समजले. त्या शिबिरात मच्छिंद्रनाथ आणि सुशीला मुंडे या दाम्पत्याच्या सहकार्याने जॉईन झालो. नंतरच्या खारघरच्या शिबिरातून चमत्काराचे किट

व साहित्य मिळवले आणि नवी मुंबई शाखेत क्रियाशील कार्यकर्ता म्हणून काम करू लागलो. चमत्कार सादरीकरण, इतर उपक्रम आणि कार्यक्रम यांचे नेटके आयोजन कसे करावे याबाबत पनवेलच्या आरती, महेंद्र अशा तरुण आणि अनुभवी कार्यकर्त्यांकडून शिकायला मिळाले. त्यांच्या मार्गदर्शनाचा खूपच फायदा झाला. नंतर नवी मुंबई शाखेचा कार्याध्यक्ष झालो.

मुंबई म्हणजे गतिमान जीवन. मुंबईकराच्या प्रत्येक मिनिटाचे नियोजन असते. आम्ही कार्यकर्ते देखील संघटनेच्या कामासाठी या नियोजनातून वेळ काढू लागलो. साथी अशोक निकम यांची साथ अगदी सुरुवातीपासूनच. जेवढे कार्यकर्ते होते त्यांनी वेळ मिळेल त्याप्रमाणे कधी सकाळी तर कधी संध्याकाळी गटागटाने उपक्रम करायचे; कधी रेल्वे प्लॅटफॉर्मवरच मिटिंग घ्यायची तर कधी एखाद्या बागेत मिटिंग घ्यायची. एक बाब कटाक्षाने पाळली जायची की मिटिंग जिथे असेल तिथे शाखेचा बॅनर लावायचाच. जवळजवळ प्रत्येकाकडे शाखेचा बॅनर होताच. रेल्वे प्लॅटफॉर्मवरच सभासद नोंदणीचा उपक्रम सुरु व्हायचा. अनेक तरुण सभासद जोडले गेले. यातूनच आम्हाला नव्या दमाचे तरुण कार्यकर्ते मिळाले. अशाचप्रकारे तरुण कार्यकर्ते जोडण्याचा ध्यासच आमच्या शाखेने घेतला होता. नवी मुंबईमध्ये जवळजवळ ६० ते ७० शाळांमध्ये कार्यक्रम सादर केले. मिटिंग ही एक पार पाडायचे कर्मकांड न राहता त्यानंतर मिटिंगमध्ये नियोजित केलेली कामे ताबडतोब पूर्ण करणे याकडे माझा कटाक्ष असतो. पुढील मिटिंगमध्ये त्याच कामासाठी पुढची तारीख, तारीख पे तारीख नकोच. अशी माझी कार्यपद्धती असल्याने माझा वेग फारच अधिक असल्याचे सहकारी म्हणतात.

नंतर नवी मुंबई, जिल्हा शाखा स्थापण्यात साथी अशोक निकम आणि इतरांच्या सहकार्याने मोठा वाटा उचलण्याचे धाडस केले. करूया, नको करूया असे करत जिल्हा शाखा स्थापन झाली. आणि थोड्याच दिवसांनी मी सेवानिवृत्त होऊन औरंगाबाद येथे आलो. औरंगाबाद येथे शहर शाखेचे कार्याध्यक्ष पद काही वर्षे स्वीकारले. त्यानंतर औरंगाबाद जिल्हा कार्याध्यक्ष म्हणून काम केले. औरंगाबाद जिल्ह्यात एक तालुका वगळता सर्व तालुकास्तरावर शाखा स्थापन केल्या. अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचा शतकवीर पुरस्कार मिळाला. संघटनेमधील विचारांच्या प्रभावामुळे माझा व्यक्तिमत्व विकास घडला. तो वारसा माझ्या मुलांनाही देता आला. आता गावोगावी, शाळेशाळेत जाऊन चमत्कार सादरीकरण, व्यसनमुक्ती असे उपक्रम राबवतो. औरंगाबादमधील १० ते १२ शाळांमध्ये आतापर्यंत वैज्ञानिक दृष्टीकोन आणि चमत्कार सादरीकरण कार्यक्रम केले आहेत.

त्याचबरोबर खऱ्याखुऱ्या वारकरी संप्रदायाचा सम्यक विचार लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम सध्या करीत आहे. संत व समाजसुधारकांचा वारसा आणि संघटनेचे कार्य यांच्यात दुवा निर्माण करण्याचे काम सध्या करीत असतो. औरंगाबाद तालुक्यामध्ये पाखंड खंडन प्रयोग व संतांचे विचार हे कार्यक्रम जवळजवळ ७० ते ८० खेड्यामध्ये सादर केले. खूप काळ कुंपणावर बसून होतो त्याची भरपाई करण्याचा प्रयत्न करतो आहे. एकटाच काम करत होतो त्यावेळच्या समाजकार्यात, धार्मिक कार्यात तेव्हापासून तर आता संघटनेत काम करतो त्यातही मला माझ्या धार्मिक असणाऱ्या पत्नीने व आईने या सर्व कार्यात खूप सहकार्य केलेले आहे.

डॉ. घारपुरे दाम्पत्यांनी जर माझे पालकत्व स्वीकारले नसते तर मी भारतातला एक कुप्रसिद्ध नक्षलवादी झालो असतो. कारण मॅट्रिक नंतर मला जगात सगळीकडे अंधारच अंधार पसरलेला दिसत होता. घारपुरे दांपत्याकडे खऱ्या अर्थाने विवेकवाद काय असतो याची जडणघडण झाली व तेथूनच जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला. विज्ञान, निर्भयता, नीती हे शब्द जेव्हा मला माहितीही नव्हते तेव्हा हे कुटुंबीय या शब्दांनुसार जीवन जगत होते. त्यांच्याकडे राहत असताना मला कॉलेज व्यतिरिक्त वेळ मिळत नसला तरी घरामध्ये मात्र अभ्यासाला भरपूर वेळ मिळे. त्यामुळे मी त्यांच्याकडे येणारे मराठी आणि इंग्रजी दैनिक वर्तमानपत्रे अगदी अ पासून ते ज्ञ पर्यंत वाचू लागलो. त्यांच्या लायब्ररीमधील बरीच पुस्तके वाचून काढली. त्यातूनच समाजवाद, साम्यवाद इत्यादी काय ते समजले. त्याच काळात त्यांच्याकडे येणारे सामाजिक कार्यकर्ते यांच्याशी परिचय झाला आणि पुढे बँकेत लागल्यानंतर या सर्व सामाजिक कार्यकर्त्यांकडून मला खूपच सहकार्य मिळाले. त्यांच्यातील सर्वच औरंगाबाद येथील पुरोगामी चळवळीतील कार्यकर्ते आहेत. बँकेत नोकरी करत असतानाच जे शालेय व कॉलेज जीवनात करायला मिळाले नाही ते नेतृत्व करण्याचा प्रयत्न केला. रिक्रीएयन सचिव, युनियन ॲक्टिव्हिटी मध्ये भाग घेतला आणि अंगी कुठलीही कला अवगत नसताना मराठवाडा विद्यापीठात नाट्यशास्त्र विभागाच्या पदविका अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला; त्यातही मेरिटमध्ये उत्तीर्ण झालो. त्यानंतर वकील व्हावे अशी खूप इच्छा होती; म्हणून एल एल बी चे शिक्षणही बँकेमध्ये असतानाच पूर्ण केले.

●



# लोकशाहीच्या समर्थनासाठी मानवतावादी एकत्र

**प्रा. डॉ. सुदेश घोडेराव,** नाशिक
९४२२२५७६५४

जागतिक मानवतावादी परिषदेसाठी जगभरातील चारशेहून अधिक मानवतावादी कोपनहेगन, डेन्मार्क येथे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय मानवतावादी परिषदेमध्ये दि. ३ ते ६ ऑगस्ट २०२३ दरम्यान उपस्थित होते. या परिषदेचे आयोजन ह्युमॅनिस्ट इंटरनॅशनलच्या माध्यमातून डेन्मार्क, नॉर्वे, स्वीडन, फिनलँड, आइसलँड या स्कॅन्डिनेव्हियन देशातील सदस्य संस्थांद्वारे आणि प्रामुख्याने डॅनिश ह्युमॅनिस्ट सोसायटी, डेन्मार्क यांचे वतीने केले होते. या परिषदेचे आयोजन साधारणपणे दर तीन वर्षांनी केले जाते. कोविड महामारीमुळे २०१७ आणि २०२० मधील आंतरराष्ट्रीय परिषदा रद्द करण्यात आल्या होत्या. या परिषदेची मुख्य संकल्पना 'मानवतावादी मूल्यांद्वारे उत्तम लोकशाहीचे निर्माण' ही होती. ह्युमॅनिस्ट इंटरनॅशनलच्या सदस्यांना एकत्र येण्याची, कल्पनांची देवाण-घेवाण करण्याची, परस्परसंबंध प्रस्थापित करण्याची आणि मानवतावादाचे भविष्य शोधण्याची संधी बऱ्याच वर्षानंतर प्राप्त झाली. या परिषदेसाठी उत्तर अमेरिका, लॅटिन अमेरिका, पश्चिम आणि पूर्व युरोप, आफ्रिका, अशिया आणि ऑस्ट्रेलियातील मानवतावाद्यांची उपस्थिती आणि स्वागत करण्यात आले. परिषदेच्या मुख्य संकल्पनेनुसार लोकशाही समोरील धोके, लोकशाहीचे खच्चीकरण, धार्मिक स्वातंत्र्य आणि मानवी हक्क अशा विषयांवर परिसंवादाचे आयोजन तसेच तरुणांना मानवतावादाकडे कसे आकर्षित करता येईल, कला-एक मुक्त संवादाचे माध्यम, जागतिक हवामान बदल, मानवतावाद आणि तंत्रज्ञान, एलजीबीटीक्यूए यांचे हक्क, युद्धानंतर युक्रेनियन लोकशाहीची पुनर्बांधणी आणि नास्तिकांवरील दडपशाही इत्यादी विषयांवर सखोल चर्चा झाली. या परिषदेच्या माध्यमातून लोकशाही संदर्भाने कोपनहेगन जाहीरनामा मंजूर करण्यात आला. त्यातील मुख्य मुद्दे पुढीलप्रमाणे –

- लोकशाही हे एक वैश्विक मूलभूत मूल्य असून जगभरातील मानवतावादी तत्त्वांच्या प्राप्तीसाठी आवश्यक आहे.
- नागरिकांच्या बदलत्या गरजा आणि आकांक्षांना प्रतिसाद देणाऱ्या संस्था आणि कार्यपद्धतींसह लोकशाही व्यापकपणे सर्वसमावेशक, पारदर्शक, उत्तरदायी आणि धर्मनिरपेक्ष असली पाहिजे.



- नागरिकांना सक्षम केले पाहिजे आणि नागरिकत्वाचा अधिकार पूर्वग्रह न ठेवता संरक्षित केला पाहिजे.
- एक संस्कृती म्हणून लोकशाहीचे सर्व धोक्यांपासून सक्रियपणे संरक्षण केले पाहिजे. हुकूमशाही तत्त्वे स्वीकारणारे शासन, चळवळी आणि राजकीय पक्ष, बेहिशोबी आर्थिक आणि सामाजिक शक्ती तसेच लोकशाही मूल्य आणि संस्थांना दुर्बल किंवा कमकुवत करण्याचा प्रयत्न करणाऱ्या इतर सर्व शक्तींपासून लोकशाहीचा सक्रियपणे बचाव केला पाहिजे.

परिषदेच्या 'लोकशाही आणि मानवतावाद' या विषयावरील मुख्य सत्रामध्ये फेडरेशन ऑफ इंडियन राष्ट्रीय असोसिएशनसह महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या

कार्याचा आणि भारतातील सद्य परिस्थितीमधील इतर विवेकवादी चळवळींच्या कार्याचा प्राथमिक परिचय प्रा. डॉ. सुदेश घोडेराव यांनी करून दिला. धर्मनिहाय लोकसंख्या, समाजसुधारकांच्या हत्या, निवडणुकीतील संभाव्य बदलाबाबत, जसे प्रॉक्सी मतदान, नागरिकत्व सुधारणा कायदा (सीएए), तसेच प्रस्तावित समान नागरी कायद्याबाबत त्यांनी मत व्यक्त केले. लोकशाहीचे चार प्रमुख आधारस्तंभ-विधिमंडळ, कार्यपालिका, न्यायपालिका आणि मीडिया यांची सद्यपरिस्थितीत कशी गळचेपी होत आहे, त्याबद्दल त्यांनी मत मांडले. योगाचा आरोग्य उपचारविषयक झालेला समावेश, नवीन शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत प्राचीन ज्ञानप्रणालीचा समावेश याबाबत वस्तुस्थिती मांडली. तसेच या अनुषंगाने निर्माण झालेल्या समस्यांना सोडवण्यासाठी विविध संस्था, संघटना यांचेमार्फत सुरू असलेले कार्य याचे देखील विवेचन केले. भारतातील मानवतावादी संस्था, संघटना आणि कार्यकर्ते लोकशाहीच्या संरक्षणासाठी सदैव प्रयत्नशील राहतील, अशी आशादेखील व्यक्त केली.



परिषदेच्या दरम्यान भरविलेल्या प्रदर्शनामध्ये महाराष्ट्रातील जादूटोणाविरोधी कायद्याचे पोस्टर्स प्रदर्शित केले होते. विविध देशांतील मानवतावादी प्रतिनिधींनी आवर्जून पोस्टर्स बघितली आणि या कायद्याला आणि कार्याला पाठिंबा दर्शविला. या परिषदेच्या पुरस्कार वितरण समारंभात 'मानवतावादासाठी प्रतिष्ठित सेवा पुरस्कार २०२०' (Distinguished Services to Humanism Award 2020) ह्युमॅनिस्ट इंटरनॅशनलचे अध्यक्ष अँड्रू कॉपसन यांच्या हस्ते प्रा. डॉ. सुदेश घोडेराव यांना प्रदान करण्यात आला.

परिषदेच्या दुसऱ्या समांतर सत्रात 'भारतातील धार्मिक असहिष्णुता' या विषयावरील परिसंवादात फेडरेशन ऑफ इंडियन रॅशनॅलिस्ट असोसिएशनच्या वतीने जनरल सेक्रेटरी प्रा. डॉ. सुदेश घोडेराव, नास्तिक केंद्र, विजयवाडाचे विकास गोरा आणि आंध्रप्रदेशमधील प्रसिद्ध कार्यकर्ते बाबू गोगिनेनी यांनी सहभाग घेतला. भारतात घडत असलेल्या विविध घटनांच्या माध्यमातून धार्मिक असहिष्णुता कशी वाढत चालली आहे, याची सखोल चर्चा या सत्रामध्ये झाली. परिषदेच्या तिसऱ्या चर्चेत 'आशिया खंडातील मानवतावाद्यांसमोरील सामाजिक आव्हाने आणि परस्पर सहकार्याबाबत शक्यता' यावर चर्चा करण्यात आली. भारत, नेपाळ, पाकिस्तान, फिलिपाईन्स आणि सिंगापूर येथील विविध मानवतावादी संस्थांच्या प्रतिनिधींचा समावेश या चर्चेत होता.

या परिषदेच्या निमित्ताने झालेल्या सर्वसाधारण सभेत ह्युमॅनिस्ट इंटरनॅशनलच्या आंतरराष्ट्रीय कार्यकारिणीच्या विविध पदांवर निवडणूक संपन्न झाली. भारतातील फेडरेशन ऑफ इंडियन रॅशनॅलिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र नायक यांना सरकारने पूर्ववत पोलीस संरक्षण द्यावे, असा देखील ठराव यावेळी मंजूर करण्यात आला. जागतिक मानवतावादी परिषदेतील माझे प्रतिनिधित्व, सहभागासह जगातील प्रमुख मानवतावाद्यांची प्रत्यक्ष भेट, चर्चा हा एक आश्चर्यकारक, आनंददायी, ज्ञानवर्धक आणि संस्मरणीय अनुभव होय.

लेखक महा.अंनिसच्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय समन्वय विभागाचे राज्य कार्यवाह आहेत.

●



# महा. अंनिसची खबरबात

**अनिल शोभना वसंत,** पालघर
९८२३२८०३२७

**शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर स्मृतिदिन**

**अहमदपूर :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापासून शहरातील प्रमुख मार्गाने निर्भय मॉर्निंग वॉक करण्यात आले. डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमात महा.अंनिस, मराठा सेवा संघ, बोधिसत्व फाऊंडेशन, शाहू राजे योगा ग्रुप, ग्रामीण विकास लोकसंस्थांचे कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते. प्रास्ताविक अंनिसचे राज्य निमंत्रक हरिदास तम्मेवार यांनी केले. शाखा प्रधानसचिव बाबासाहेब वाघमारे यांनी सूत्रसंचालन, तर मनोहर पाटील यांनी आभार मानले.

**वर्धा :** जिल्हा कार्यकारिणी व शहर शाखा वर्धा यांनी वर्धा शहरात निर्भय मॉर्निंग वॉकचे आयोजन केले. बुद्ध टेकडी येथे शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ पिंपळाच्या झाडाचे वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

**चंद्रपूर व ऊर्जानगर :** दोन्ही शाखेच्या वतीने कामगार मनोरंजन केंद्र येथे डॉ. नरेंद्र दाभोलकरांना अभिवादन करून निर्भय मार्निंग वॉकचे आयोजन करण्यात आले. महा. अंनिसचे चंद्रपूर जिल्हा कार्याध्यक्ष पी.एम.जाधव यांच्या मार्गदर्शनाने समारोप करण्यात आला. यावेळी जिल्हा प्रधानसचिव नारायण चव्हाण, ऊर्जानगर शाखेचे अध्यक्ष मुरलीधर राठोड, कार्याध्यक्ष देवराव कोंडेकर, सचिव बाळकृष्ण सोमलकर, माजी अध्यक्ष राजा वेमुला, दूर्वेंद्र गेडाम, संजय जुनारे, विजय राठोड, अशोक खाडे, नितीन राव, अक्षय राठोड, प्रेषित चव्हाण तसेच अंनिसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



**शिंदखेडा :** डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अनेक पैलूंवर मान्यवरांनी केलेल्या अभिवादन निर्धार सभेत मनोगतातून प्रकाश टाकला. या प्रसंगी सॉक्रेटिस ते दाभोलकर – पानसरे व्हाया तुकाराम हे रिंगण नाट्य दाखविण्यात आले. उपस्थित सर्वांना अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचे अंक देण्यात आले. शेवटी अभिवादन गीत म्हणून कार्यक्रमाची सांगता झाली.

**पूर्णा :** येथील भैय्यासाहेब सांस्कृतिक सभागृहात शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या १०व्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने चमत्कार सादरीकरण व प्रबोधन गीते सादर केली. डॉ. दाभोलकरांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. यावेळी अशोक एंगडे, अमृत कहाळे, प्रा. शेख नसीर, प्रबुद्ध काळे, जय एंगडे उपस्थित होते.

**लासूर :** लासूर स्टेशन येथे डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी भास्कर बनसोडे व प्रकाश सोनवणे यांनी अभिवादन गीत सदर केले. ज्ञानेश्वर वाघचौरे यांनी डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला.

विवेक जागर करंडक पथनाट्य स्पर्धेचे आयोजन

**पनवेल :** पनवेल शाखा व इन इनिव्हील क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाउन यांच्या विद्यमाने ही पथनाट्य स्पर्धा १९ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेचा विषय होता प्रोपगंडा. या स्पर्धेत प्रथम क्रमांक – गिरगावच्या अप नेक्स्ट ग्रुपने पटकावला, तर द्वितीय क्रमांकाचे मानकरी ठरले. माटुंग्याचे रामणारायन रुईया कॉलेज आणि तृतीय क्रमांक मिळविला, निर्मला निकेतन कॉलेज. या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक सुशील कांबळे (नाट्यरुची कलामंच, चेंबूर) सर्वोत्कृष्ट अभिनय– अभिषेक नाईक (आम्ही प्रबोधनकार, अलिबाग),

सर्वोत्कृष्ट लेखक – प्रमोद गायकवाड (परिवर्तन नाट्य अकॅडमी, खोपोली) यांना गौरवण्यात आले. विजेत्यांना रोख रक्कम, सन्मानचिन्ह, पुस्तके व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.

**सर्व धर्मीय रक्षाबंधन**

**शहादा :** शाखेच्या वतीने रक्षाबंधनाच्या निमित्ताने सर्व धर्मीय रक्षाबंधन असा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. त्याला सद्भावना रक्षाबंधन असे नाव देऊन विविध धर्मातील मुला–मुलींना (शाळेतील) एकत्रित करून रक्षाबंधन साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाच्यावेळी मुस्लीम धर्माच्या विद्यार्थिनींनी हिंदू समाजातील मुलांना राखी बांधली. त्याचबरोबर हिंदू धर्मातल्या मुलींनी मुस्लीम धर्मातील मुलांना राखी बांधून रक्षाबंधनाचा कार्यक्रम साजरा केला. त्याचबरोबर मुलांनी देखील सर्व मुलींना राखी बांधून रक्षाबंधनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला. त्यामुळे मुलानेच फक्त राखी बांधून घेऊन बहिणीचे रक्षण करू असा संदेश न देता मुलीदेखील मुलांना राखी बांधून आम्हीदेखील तुमचं रक्षण करू शकतो, असा संदेश या निमित्ताने दिला. सदर विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य भेट म्हणून देण्यात आले.

**अण्णा भाऊ साठे जयंती**

**औसा (लातूर) :** लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे औचित्य साधून मौजे वांगजी, येथे अंनिसचे ज्येष्ठ कार्यकर्ते हनुमंत मुंढे यांचे संत साहित्यातील संविधान मूल्य या विषयावर जाहीर व्याख्यान झाले. यावेळी विनोद डाके, संतोष आडगळे आणि गावातील नागरिक या कार्यक्रमास उपस्थित होते.

**आगळावेगळा वाढदिवस**

**नागपूर :** कोराडी शाखेचे अध्यक्ष ताराचंद पखिडे यांनी गोधनी येथील विल्किन्सन शाळेतील विद्यार्थ्यांना सहा हजार चारशे रुपयांची राशी दान देऊन ६८ वा जन्मदिवस साजरा केला. या अनुषंगाने विद्यार्थ्यांना विज्ञानाची प्रात्यक्षिके दाखवून वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यात आला. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष मधुकर धंदरे यांनी समिती सातत्याने राबवित असलेल्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाची जडणघडण होत असल्याचे सांगितले. यावेळी जिल्हा अध्यक्ष जगजित सिंग यांनी हवेच्या दाबाचा प्रयोग करून दाखविला. विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीचा संदेश देण्याकरिता नशाबंदी मंडळातर्फे पोस्टर्स प्रदर्शन लावण्यात आले होते.

**‘प्रेम आणि हिंसा’ या विषयावर संवाद**

**लातूर :** व्यंकटराव देशमुख महाविद्यालय या ठिकाणी ‘प्रेम आणि हिंसा’ या विषयावर संवाद घडवून आणला. शहर कार्याध्यक्ष डॉ. दशरथ भिसे यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. विद्यार्थ्यांनी खूपच छान प्रतिसाद दिला.

**महा. अंनिस नवीन शाखेची स्थापना**

**औरंगाबाद :** औरंगाबाद जिल्ह्यातील आडगाव सरक येथे नुकतीच महा. अंनिसची शाखा स्थापन करण्यात आली. शाखेचे उद्घाटन के. ई. हरिदास यांनी नारळावर अग्नी




प्रज्वलित करून केले. प्रास्ताविक जिल्हा कार्याध्यक्ष भास्कर बनसोडे यांनी केले. याप्रसंगी ॲड. अभय निकाळजे, गीता कोल्हटकर, प्रशांत कांबळे, सुनील चौथमल, मेजर सुखदेव बन, शामदंडे, श्रीधर मुळे, डॉ.कृष्णा भावले, शिवाचार्य अंभोरे, शंकर मोकळे (गुरुजी) सहभागी झाले होते. भाऊ पठाडे यांनी आभार मानले.

**चमत्कार सादरीकरण प्रशिक्षण शिबिर**

**ठाणे :** ठाणे जिल्ह्याच्या वतीने डोंबिवली येथे एक दिवसीय चमत्कार सादरीकरण प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. शिबिराला मार्गदर्शक म्हणून राज्य सरचिटणीस शहाजी भोसले उपस्थित



होते. शिबिराला ३५ कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देण्यात आले. ज्यात कार्यकर्त्यांकडून चमत्कार प्रात्यक्षिके करून घेण्यात आली. परेश काठे, निशिकांत विचारे, गणेश शेलार, डॉ. सुषमा बसवंत यांनी संयोजन केले.

**कोल्हापूर :** कोल्हापूर येथे महिला विभाग सहभाग, वैज्ञानिक जाणिवा आणि शिक्षण विभाग जिल्हा कोल्हापूर तर्फे 'चमत्कारामागील विज्ञान' प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा महिला विभाग कार्यवाह मुक्ता निशांत, वैज्ञानिक जाणिवा व शिक्षण विभाग कार्यवाह विनायक सुनीता अशोक आणि जोडीदाराची विवेकी निवड विभाग राज्यकार्यवाह हर्षल जाधव यांनी मिळून सहभागी कार्यकर्त्यांना प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण दिले.



**महा.अंनिसने स्वीकारले आव्हान**

**निपाणी :** सुळगांव, ता. निपाणी येथे नारळ, लिंबू, हळद-कुंकू व एका काळ्या बाहुलीत एका मुलीचा फोटो व त्या फोटोला टाचण्या टोचून वशीकरण किंवा करणी करण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा कागल, भीम क्रांती तरुण मंडळ सुळगांव व समविचारी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने या घटनेचा निषेध व्यक्त केला. यावेळी प्रा. सदाशिव पोवार, अंशुमन सुळगांवकर, रवि कांबळे, भिकाजी कांबळे, संतोष कांबळे, अजित कांबळे, संजय पोवार, प्रेम कांबळे, मल्लेश कांबळे, शक्ती कांबळे, बाबासो कांबळे, आनंदा पोवार, विशाल कांबळे, प्रितम, रुपेश, अनुराग आदि कार्यकर्ते उपस्थित होते.





**सर्पविज्ञान प्रबोधन**

**बेलापूर :** शाखेतर्फे सर्पविज्ञान प्रबोधन सप्ताह अभियानांतर्गत 'सर्पविज्ञान' कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. सदरचा कार्यक्रम कुकशेत येथील नवी मुंबई महानगरपालिका संचलित शाळा क्रमांक ९२ व १२१ मधे पार पडला. नेचर फ्रेन्ड सोसायटी पनवेलचे सर्पमित्र संतोष उदरे यांनी पीपीटी द्वारे सापांबद्दलच्या अंधश्रद्धा विद्यार्थ्यांना उलगडून सांगितल्या. कार्यक्रमात अरूण जाधव, आरती घोगरे, आर्यन उदरे व अशोक निकम यांनी यामध्ये सक्रिय सहभाग नोंदवला.

**सर्व कर्मकांडांना फाटा देऊन केला गृहप्रवेश**



प्रा.डॉ.काशिलींग गावडे यांनी इस्लामपूर येथे घेतलेल्या घराचा गृहप्रवेश २३ ऑगस्ट, २०२३ रोजी सर्व कर्मकांडांना नकार देत आई शहाबाई गावडे यांच्या हस्ते फित कापून केला. धर अनोख्या गृहप्रवेशाला पत्नी दिपाली, कन्या अहिल्या व अनन्या तसेच बंधु संजय गावडे यांचे पाठबळ होते. प्रा. डॉ. गावडे हे अंनिसचे सांगली जिल्हा प्रधान सचिव असून त्यांनी आपला विवाह देखील सत्यशोधक पद्धतीने केला होता. या अनोख्या गृहप्रवेश प्रसंगी प्रा. विजयकुमार जोखे, प्रा. डॉ. नितीन शिंदे, अंनिसचे राज्यप्रधान सचिव संजय बनसोडे, प्राचार्य डॉ. उज्वला पाटील तसेच बाबा नाईक महाविद्यालय कोकरूडचा सर्व स्टाफ उपस्थित होते.

# गणितप्रेमी

सुरज उर्मिला सुनील

**कोडे क्र. ११**

खालील चौकोनात मी गणिताशी संबंधित २० शब्द लपवले आहेत. ते सर्व शब्द शोधा. लपवलेले शब्द उभे, आडवे, उलटे किंवा तिरके असू शकतात. हे शब्द गणितातील संकल्पना, शाखा, गणितासाठी काम केलेले व्यक्ती अशा प्रकारचे आहेत. प्रत्येक शब्द कमीतकमी तीन अक्षरी आहे. तुम्हाला सापडलेले शब्द ९४२३३९५०९७ या व्हॉट्सअपवर नक्की पाठवा.

| | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जा | ते | ली | म | क्षे | त्र | फ | ळ | पा | चि | मा | के | गी | डो | त्र | प्रे | ट |
| पा | ष्ट | लौ | अ | पु | दा | जी | मा | मा | ने | प | रा | ची | ज्य | ये | फौ | क्त |
| गौ | भ | झे | पू | रा | घी | शे | द्य | ध | फं | न | बं | ळे | रा | किं | र | मा |
| कौ | ज | दो | र्णा | ल | गा | ल | दै | कि | न | हा | से | मं | दै | म | बै | नं |
| ळे | झ | शे | क | डे | वा | री | धं | पं | गो | रे | वि | ग | णि | त | प्रे | मी |
| के | षि | प | मा | भा | द | फा | य | च | ब्द | को | ष | ला | रे | चो | ल | पी |
| पा | टी | रे | ल | स्क | क्ष | ज्ञी | को | को | ला | तु | म | ना | दू | जा | हो | का |
| य | डी | बी | छे | रा | मा | नु | ज | न | टे | कै | सं | र | पा | ख्य | क्क | दं |
| था | दै | ज | द | चा | क | मो | जे | दै | मा | जु | ख्या | ळी | तू | डा | कॉ | ट |
| गो | त | ग | क्र | र्य | चौ | क | ग | हे | सा | प | ला | क | रे | मा | त | र्य |
| र | ते | णि | ची | रं | रा | चो | ती | मा | ळ | चे | क | र | का | गा | भा | चा |
| स | मां | त | र | रे | षा | सा | मि | ऱ्या | सां | घ | ल्प | र | ध | ती | नै | मा |
| चिं | ल | के | त | सा | नी | री | भू | म | ख्यि | रै | ना | ले | गा | हो | ज्ञ | गै |
| धी | दे | ष | रॅ | ज्ञा | भ | व | जा | बा | की | मी | श | ली | षै | शी | घा | ध |
| मा | ले | घो | यी | ढ | वा | जै | दे | रा | टी | को | क्ती | ची | ल | प | ना | री |

कोडे क्र. १० चे उत्तर – कागदाच्या एका बाजूला ७ ठिपके आणि दुसऱ्या बाजूला ५ ठिपके याप्रमाणे एकूण १२ ठिपके आहेत.

# विवेक–विज्ञान शब्दकोडे क्र. १५

– उत्तम जोगदंड

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ३ | ४ | | ५ | | ६ |
| | ■ | | ■ | ७ | | ■ | | ■ | |
| | ■ | ८ | ९ | | | ■ | | ■ | |
| | ■ | १० | | | ■ | ११ | | | ■ |
| | ■ | | ■ | | ■ | ■ | | ■ | १२ |
| १३ | १४ | | ■ | ■ | १५ | | | | |
| ■ | | ■ | ■ | ■ | | ■ | | ■ | |
| १६ | ■ | १७ | ■ | १८ | | ■ | | ■ | |
| १९ | | | २० | | | २१ | | २२ | ■ |
| | ■ | ■ | २३ | | ■ | | ■ | | ■ |

**आडवे शब्द:**

१) विजयादशमीला बौद्ध बांधव हा सण साजरा करतात

७) ऊर्ध्व दिशा किंवा लग्नातील नवरा मुलगा

८) परंपरेने वाढवलेले आणि पवित्र मानले गेलेले जंगल

१०) यंत्रे, वाहने चालवण्यासाठी हे आवश्यक असते

११) भारताच्या सुपर कॉम्प्युटरचे नाव

१३) दिल्लीच्या गादीची पहिली मुस्लीम महिला शासक, *** सुल्ताना

१५) आकड्यांवर आधारित एक विषय

१८) एखादी त्रिमितीय वस्तू स्वतःभोवती फिरताना या रेषेच्याभोवती फिरते

१९) महा. अंनिसच्या लोगोखाली लिहिलेले तीन महत्त्वाचे शब्द

२३) बगळा हा पक्षी या नावानेसुद्धा ओळखला जातो

**उभे शब्द**

१) डॉ. आंबेडकर, म. फुले, सावरकर यांची विस्तृत चरित्रे लिहिणारे प्रसिद्ध लेखक

२) पराभूत महिला हॉकीपटूंना विजयाकडे कसे नेले यावर आधारित एक हिन्दी चित्रपट

३) महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील एक नदी

४) एक तृणधान्य. याचा भात उपवासाला चालतो असे म्हणतात

५) ऑप्टिक फायबरचा शोध लावणारे भारतीय वंशाचे शास्त्रज्ञ

६) आकाशातील तारकासमूह

९) दुष्टप्रवृत्तीच्या लोकांच्या हत्येसाठी वापरला जाणारा आणि वादग्रस्त ठरलेला शब्द

१२) दातांना होणारा एक रोग

१४) कोरोना काळात मध्येच आलेला एक व्हायरस, मच्छर दंशातून हा पसरतो

१५) मक्याचा कोवळ्या पानांवर होणारा बुरशीचा रोग

१६) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या द्वितीय पत्नीचे नाव

१७) या अवयवामुळे आपण ऐकू शकतो

१८) तान्हे बाळ

२०) फौंटनपेनाचे लिहिण्याचे धातूचे टोक

२१) रात्री लुकलुकणारा आकाशीय गोल

२२) सिक्कीम आणि प. बंगाल राज्यातून वाहणारी एक नदी.

(उत्तर पुढील अंकात)

## विवेक–विज्ञान शब्दकोडे १४ चे उत्तर

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ध | म्म | २च | क्र | ३प्र | ४व | र्त | ५न | दि | ६न |
| नं | ■ | क | ■ | ७व | र | ■ | रिं | ■ | क्ष |
| ज | ■ | ८दे | ९व | रा | ई | ■ | द | ■ | त्रे |
| य | ■ | १०इं | ध | न | ■ | ११प | र | म | ■ |
| की | ■ | डि | ■ | दी | ■ | ■ | सिं | ■ | १२दं |
| १३र | १४झि | या | ■ | ■ | १५अं | क | ग | णि | त |
| ■ | का | ■ | ■ | ■ | ग | ■ | क | ■ | क्ष |
| १६स | ■ | १७का | ■ | १८अ | क्ष | ■ | पा | ■ | य |
| १९वि | ज्ञा | न | २०नि | र्भ | य | २१ता | नी | २२ति | ■ |
| ता | ■ | ■ | २३ब | क | ■ | रा | ■ | स्ता | ■ |

## जाहिरात नोंदणी प्रपत्र

प्रति,
मा. संपादक,
अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका
इस्लामपूर, जि. सांगली
महोदय,

आम्ही आपल्या 'वार्षिक विशेषांक २०२३' मध्ये जाहिरात देऊ इच्छितो. जाहिरातीचा प्रकार (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा)

| | |
|---|---|
| कव्हर पान न. २/३(रंगीत) | कव्हर पान न. ४ (रंगीत) |
| पूर्ण पान (रंगीत) | पूर्ण पान(कृष्णधवल) |
| अर्धे पान(रंगीत) | अर्धे पान(कृष्णधवल) |
| पाव पान(रंगीत) | पाव पान (कृष्णधवल) |
| सदिच्छा चौकट | नावपट्टी |
| पर्यावरण रक्षणासाठी केवळ नाव छापावे. | |

जाहिरातीसाठी चेक/ड्राफ्ट/ऑनलाइन

क्र. .................................................. दि.

बँकेचे नाव : ..................................................

रु. ........................... (अक्षरी रु. ..................................................

.................................................. मात्र) सोबत जोडला आहे.

आपला

(स्वाक्षरी व शिक्का)

जाहिरातदाराचे नाव : ..................................................

पत्ता : ..................................................

मो. : ..................................................

● जाहिरातीचा मजकूर स्वतंत्र जोडावा.

## महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती संक्षिप्त परिचय

- राज्यभर ३६ जिल्ह्यातून ३५० हून अधिक शाखा कार्यरत, ५ हजारहून अधिक सक्रिय कार्यकर्ते
- चमत्कार सादरीकरण व व्याख्यानाचे दरवर्षी हजारो कार्यक्रम.
- सर्वधर्मीय शेकडो तथाकथित बुवाबाबांचा यशस्वी भांडाफोड.
- चमत्काराचा दावा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला २१ लाख रुपयाचे आव्हान
- वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्यासाठी आजवर २५००० शिक्षकांचे प्रशिक्षण व लाखो विद्यार्थ्यांशी संवाद.
- यात्रेतील पशुहत्या थांबवण्यात यश.
- साध्या, सत्यशोधकी, नोंदणी पद्धतीने आंतरजातीय, आंतरधर्मीय ११०० पेक्षा जास्त विवाह संपन्न.
- सण उत्सवांना पर्यावरणपूरक कालसुसंगत पर्याय देण्यात यशस्वी.
- युवांच्या विवाहाबाबत जाणिवा समृध्द करणारी संवाद कार्यशाळा 'जोडीदाराची विवेकी निवड'.
- जात पंचायतीच्या मनमानी विरुध्द 'जात पंचायतीला मूठमाती अभियान'.
- अध्यात्मिक बुवाबाजी व छद्मविज्ञानाविरोधी प्रबोधन.
- जादूटोणा विरोधी कायदा व सामाजिक बहिष्कार विरोधी कायद्याच्या निर्मितीमध्ये सक्रीय सहभाग. कायद्याचे प्रभावी प्रबोधन व अंमलबजावणी.
- इतर राज्यात कायदा करण्यासाठी सर्वतोपरी मदत.
- युगांडा (द.आफ्रिका) देशात नरबळी विरोधी कायदा करण्यासाठी मार्गदर्शन.
- अंधश्रद्धा निर्मूलन विषयक पुस्तकांचे प्रकाशन आणि वितरण.
- अमेरिकेतील प्रतिष्ठेचा अविजीत रॉय करेज ॲवॉर्ड २०१९.
- हजारो व्यक्तींचे जटानिर्मूलन केले आहे.
- विज्ञानबोध वाहिनी, अभ्यास भेट उपक्रम या अंतर्गत फिरते नभांगण, आकाश दर्शनाचे कार्यक्रम
- संविधान बांधिलकी महोत्सवातून प्रबोधन

स्थानिक संपर्क : ..................................................

शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकर स्थापित

# महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती

(स्थापना ०९ ऑगस्ट १९८९)

विज्ञान निर्भयता नीती

विवेक जागर संस्था
प्रकाशित

आम्ही वारस विवेकाचे

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे मुखपत्र

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

R.N.I.No. MAHMAR/2022/83669

## वार्षिक विशेषांक
## २०२३

## जाहिरात/देणगी संकलन
## आवाहन

राज्य कार्याध्यक्ष
**माधव बावगे**
'अभियान', प्रकाश नगर,
बार्शी रोड, लातूर ४१३५३१
मो. ९४०४८७०४३५

राज्य अध्यक्ष
**अविनाश पाटील**
'भास्कर', संघमा चौक, गोळीबार
टेकडी रस्ता, धुळे ४२४००१
मो.९४२२७९०६१०

प्रिय साथी,
सस्नेह नमस्कार,

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अधिकृत मुखपत्र असलेल्या 'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' या मासिकाचा वार्षिक विशेषांक २०२३ साठीचे जाहिरात / देणगीचे आवाहन पत्र आपल्या हाती देताना विशेष आनंद होत आहे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या संघटित कामाला ३४ वर्षे पूर्ण झाली आहेत. दि. ९ ऑगस्ट, १९८९ रोजी निवडक सहकाऱ्यांसह शहीद डॉ. नरेंद्र दाभोलकरांनी सुरू केलेले हे काम आजही अविरतपणे सुरू आहे. संख्यात्मक आणि गुणात्मकरित्या ते सतत विस्तारत राहिले आहे. शहीद डॉ. दाभोलकरांच्या बलिदानानंतरही संघटना सतत वर्धिष्णू राहिली आहे. आपण या सर्व वाटचालीचे साक्षीदार आहातच पण पाठीराखे देखील आहात. आपणासारख्या समाजाप्रति उत्तरदायित्व मानणाऱ्या सुहृदांच्या भक्कम पाठिंब्यावरच समितीची वाटचाल सुकर झाली आहे.

आज महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्ह्यातून ३५० पेक्षा अधिक शाखा आणि जवळपास ५००० पेक्षा अधिक क्रियाशील कार्यकर्त्यांच्या सातत्यपूर्ण कामातून समितीने समाजपरिवर्तनाच्या क्षेत्रात आपल्या कामाचा एक अमीट ठसा उमटविला आहे. समाजामध्ये अंधश्रद्धेचा प्रश्न आहे, तो विविधांगी व बहुपदरी आहे आणि हा प्रश्न निश्चितपणे सोडविता येऊ शकतो याचा वस्तुपाठच जगापुढे ठेवण्यात समिती यशस्वी झाली आहे. त्यामुळेच भारतातील जवळपास पंधरा राज्यात संघटनेचा संपर्क असून या कामाला मागणी आणि समाजमान्यता आहे. जागतिक स्तरावरही समितीच्या कामाची वेळोवेळी दखल घेतली गेली आहे.

प्रतिकूल परिस्थितीतही ठामपणे उभे राहण्याचा, समितीचे काम पूर्वीपेक्षाही अधिक क्षमतेने पुढे नेण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी यशस्वी करून दाखवला आहे. अंनिसच्या परिवर्तनशील विचारांच्या प्रसारासाठी 'अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका' या नावाने सुरु केलेल्या नियतकालिकाला वाचकांचा-कार्यकर्त्यांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. आता माहे नोव्हेंबर-डिसेंबर २०२३ चा विशेषांक प्रकाशित करीत आहोत. या निमित्ताने नवनिर्माणाच्या या कार्यात भागीदार होण्याचे अंतःकरणपूर्वक आवाहन करीत आहोत. आपण अंकाला अधिकाधिक रकमेची जाहिरात/देणगी द्यावी. तसेच आपल्या संपर्कातील व्यावसायिक आस्थापना, मित्र परिवाराच्या जाहिराती/देणग्या मिळवून द्याव्यात अशी नम्र विनंती आहे.

| उत्तम जोगदंड | डॉ. नितीन शिंदे | माधव बावगे | अविनाश पाटील |
|---|---|---|---|
| कार्यकारी संपादक | संपादक | राज्य कार्याध्यक्ष | राज्य अध्यक्ष |

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका — महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती

## राज्य प्रधान सचिव

संजय बनसोडे — गजेंद्र सुरकार
नंदकिशोर तळाशिलकर — डॉ. ठकसेन गोराणे

## राज्य सरचिटणीस

विनायक सावळे — शहाजी भोसले
ॲड.रंजना गवांदे — रुकसाना मुल्ला
संजय शेंडे — बबन कानकिरड
सुधाकर काशिद — विजय परब
कृष्णात कोरे — सचिन थिटे

## पंचसूत्री

### संघटनेची वैचारिक भूमिका

- शोषण करणाऱ्या, फसवणूक करणाऱ्या, दिशाभूल करणाऱ्या अंधश्रद्धांना विरोध करणे
- वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार, प्रसार आणि अंगीकार करणे
- धर्माची विधायक, कठोर, कृतिशील आणि कालसुसंगत चिकित्सा करणे
- संत आणि समाजसुधारकांचा वारसा आणि संविधानाचा मूल्य आशय कृतिशील करणे
- व्यापक परिवर्तनाच्या चळवळींशी जोडून घेणे.

ही पंचसूत्री संघटनेचा वैचारिक पाया आहे. या विचारसूत्रांच्या आधारे संघटना काम करते.

## दरपत्रक

| आकार | रंगीत दर रु. | कृष्णधवल दर रु. |
|---|---|---|
| कव्हर पान न. २/३ | ५०,०००/- | - |
| कव्हर पान न. ४ | ६०,०००/- | - |
| पूर्ण पान (१५ सेंमी x २० सेंमी) | २०,०००/- | १२,०००/- |
| अर्धे पान (१५ सेंमी x १० सेंमी) | १०,०००/- | ६,०००/- |
| पाव पान (७.५ सेंमी x १० सेंमी) | ५,०००/- | ३,०००/- |
| सदिच्छा चौकट (३ सेंमी x ५ सेंमी) | २,०००/- | - |
| नावपट्टी | - | १,०००/- |

## तांत्रिक माहिती

| | |
|---|---|
| प्रती : ६,००० | पृष्ठसंख्या २५० |
| अंकाचा आकार | १८ सेंमी x २५ सेंमी |

## बँक तपशील

जाहिरात/देणगीचा चेक/ड्राफ्ट/RTGS/NEFT/ऑनलाईन पेमेंट **'विवेक जागर संस्था'** या नावानेच काढावा.

खात्याचे नाव : **विवेक जागर संस्था**
बँकेचे नाव : ICICI Bank, धुळे
खाते क्र.: 646301002757
IFSC Code : ICIC0006463
PAN : AADTV0009R

सोबतचा QR कोड स्कॅन करुन वर्गणीदार/देणगीदार होऊ शकता
Scan & Pay

**जाहिरात/देणगी पाठविण्याचा पत्ता**
व्यवस्थापकीय संपादक
अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली - ४१५४०९.
अजय भालकर (९३५९०८०८२०)
ईमेल:manspatrika@gmail.com,
manspatrika@mans.org.in

# स्वातंत्र्यदिन जागर गीत जलसा




१५ ऑगस्ट २०२३ रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्त तसेच लोकशाहीर वामनदादा कर्डक यांच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रम विभाग आणि सांस्कृतिक अभिव्यक्ती विभागातर्फे अभिनव अशा ऑनलाईन जागर गीत जलसा या शानदार मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते. या जलसात कोल्हापूर, रायगड, मुंबई, वर्धा आणि पालघर जिल्ह्यांतील हरहुन्नरी कलाकार कार्यकर्त्यांनी दमदारपणे जागर गीते सादर केली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सुप्रसिद्ध लोकशाहीर संभाजी भगत यांच्याशी महा.अंनिसच्या विविध विभागातील कार्यकर्त्यांनी संवाद साधला. संभाजी भगत यांनी गाणी, पथनाट्य, नाटक किंवा इतर सांस्कृतिक कार्यक्रम यांचा परिवर्तनवादी चळवळींशी कसा संबंध आहे हे विस्तृतपणे सांगितले. एकूणच शाहिरीचा इतिहास आणि देशाच्या स्वातंत्र्यलढ्याचा काळ असो वा संयुक्त महाराष्ट्र चळवळ असो, संघर्षात शाहिरांच्या योगदानाबद्दल अतिशय मोलाची माहिती दिली. महा.अंनिसचे कार्याध्यक्ष माधव बावगे यांनी कलाकारांचे कौतुक करून आपले मनोगत व्यक्त केले. शाहीर एस. एस. शिंदे यांच्या विचाराने व्हावी, विचारांची लढाई या गाण्याने या मैफिलीची सांगता झाली.

# अभिनंदन



कायदा विभागाच्या कार्यवाह ॲड. मनीषा महाजन आणि ॲड. रमेश महाजन यांचा पुतण्या (ज्याला लहानपणापासून मुलासारखा सांभाळला) ॲड. भूषण महाजन (एल.एल.एम.) याचा आंतरजातीय विवाह अर्चना कलवले (सॉफ्टवेअर इंजिनिअर) सोबत राज्य कार्याध्यक्ष माधव बावगे यांनी सत्यशोधकी पद्धतीने पुण्यात २७ ऑगस्ट २०२३ रोजी लावला. विवाह खूप कमी खर्चात, अगदी मोजक्या आप्तेष्टांच्या समवेत झाला. विवाहाच्या निमित्ताने महाजन कुटुंबीयांनी महा. अंनिसला रु. २५०००/- ची देणगी दिली. नवविवाहितांचे महा. अंनिसतर्फे खूप खूप अभिनंदन!

---



महा.अंनिस गडचिरोली शहर शाखेचे प्रधानसचिव हरिदास कोटरंगे यांनी मातोश्री श्रीमती पार्वतीबाई कोटरंगे यांच्या निधनानंतर कोणतेही कर्मकांड न करता वृद्धाश्रमास अन्नदान केले. तसेच आईच्या स्मृतिप्रित्यर्थ महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, सम्यक बुद्धविहार संघटना आणि फुले दाम्पत्य प्रतिष्ठानला देणगी दिली. समितीतर्फे त्यांच्या या पुरोगामी निर्णयाचे अभिनंदन!

Registered News Paper
Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-GR/SAN/104/2023-2025
R.N.I.No. MAHMAR/2022/83669, Postal Regd. No. SGL/144/2023-2025
Posted at Urun Islampur MDG, Sangli-415409 Published and Posted on 5th of Every Month.

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका, इस्लामपूर (सांगली) वर्ष दुसरे अंक दहावा, ५ ऑक्टोबर २०२३ (मासिक), पृष्ठसंख्या ४०, किंमत रू. २०/–
Andhashradha Nirmulan Patrika, Islampur (Sangli) Vol. 2 Issue 10, 5th October 2023 (Monthly), Pages 40, Price Rs. 20/-

# अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

## वार्षिक विशेषांक २०२३

### जाहिरात/ देणगी/ वर्गणीदार आवाहन

प्रिय साथी,

सप्रेम नमस्कार,

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या चौतीस वर्षांच्या दमदार वाटचालीमध्ये आपणा सर्वांचे योगदान महत्त्वाचे आहे. सतत वेगवेगळ्या कामांमध्ये कार्यप्रवण असणे ही आता आपली गरज बनलेली आहे. दरवर्षीप्रमाणे अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिकेचा वार्षिक विशेषांक-२०२३ आपण नोव्हेंबर-डिसेंबर जोडअंक स्वरूपात प्रकाशित करीत आहोत. समितीच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी अंनिपच्या विशेषांकाचा महत्त्वाचा सहभाग राहिलेला. त्यामुळे वार्षिक विशेषांक २०२३ साठी वाचक, हितचिंतक, जाहिरातदार, देणगीदार आणि कार्यकर्ते यांनी जास्तीत जास्त जाहिराती / देणगी देऊन संघटनेचे पाठबळ वाढवावे ही नम्र विनंती.

**दरपत्रक**

| आकार | रंगीत दर रु. | कृष्णधवल दर रु. |
|---|---|---|
| कव्हर पान न. २/३ | ५०,०००/– | – |
| कव्हर पान न. ४ | ६०,०००/– | – |
| पूर्ण पान (१५ सेंमी x २० सेंमी) | २०,०००/– | १२,०००/– |
| अर्धे पान (१५ सेंमी x १० सेंमी) | १०,०००/– | ६,०००/– |
| पाव पान (७.५ सेंमी x १० सेंमी) | ५,०००/– | ३,०००/– |
| सदिच्छा चौकट (३ सेंमी x ५ सेंमी) | २,०००/– | – |
| नावपट्टी | – | १,०००/– |

**बँक तपशील**

जाहिरात/देणगीचा चेक/ड्राफ्ट/RTGS/NEFT/ऑनलाईन पेमेंट **'विवेक जागर संस्था'** या नावानेच काढावा.

खात्याचे नाव : **विवेक जागर संस्था**
बँकेचे नाव : ICICI Bank, धुळे
खाते क्र.: 646301002757
IFSC Code : ICIC0006463
PAN : AADTV0009R

सोबतचा QR कोड स्कॅन करुन वर्गणीदार/देणगीदार होऊ शकता
Scan & Pay

**उत्तम जोगदंड**
कार्यकारी संपादक

**डॉ. नितीन शिंदे**
संपादक

अंधश्रद्धा निर्मूलन पत्रिका

**माधव बावगे**
राज्य कार्याध्यक्ष

**अविनाश पाटील**
राज्य अध्यक्ष

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती

Printed Book Post

प्रति, ______________________

**प्रेषक,**

अजय भालकर
व्यवस्थापकीय संपादक
अंधश्रध्दा निर्मूलन पत्रिका
'कल्पतरू', कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजसमोर,
इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली-४१५४०९ (महाराष्ट्र)
मो. ९३५९०८०८२० ईमेल : manspatrika@gmail.com
manspatrika@mans.org.in

भारती मुद्रणालय, कोल्हापूर.